नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८३ * * अकोला * | बुधवार, दिनांक ९ एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## घसरणीनंतर सेन्सेक्स ११३५ अंकांनी वाढून बंद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
कालच्या ३% घसरणीनंतर आज ८ एप्रिल रोजी शेअर बाजार तेजीत होता. सेन्सेक्स ११३५ अंकांनी किंवा १.५५% ने वाढून ७४,२७३ वर बंद झाला. दुसरीकडे, निफ्टी ३७४ अंकांनी किंवा १.६९% ने वाढून २२,५३५ वर बंद झाला.

आजच्या व्यवहारात मीडिया, रिॲलिटी आणि सरकारी बँकांच्या शेअर्समध्ये सर्वाधिक खरेदी दिसून आली. निफ्टी मीडिया निर्देशांक ४.७२% वाढला. दुसरीकडे, निफ्टी पीएसयू बँक आणि रिअल्टी निर्देशांक सुमारे २.५०% वाढले. एफएमसीजी, आयटी आणि ऑटो सुमारे २% वाढले. आशियाई बाजारपेठांमध्ये, जपानचा निक्केई निर्देशांक सुमारे ६% ने वाढला आहे. त्याच वेळी, हाँगकाँग निर्देशांक २% ने वाढला आहे.

अग्राग्रलेख

**खरीखरी...**

## चीनने थोपटले दंड

आज जगात अमेरिकेनंतर चीन हाच शक्तिशाली देश आहे. हे आता आपण माहिती करून घेतले पाहिजे. गेल्या तीन-चार दशकात कम्युनिस्ट राजवट असतानाही चीनच्या राज्यकर्त्यांचे भांडवलदारी व्यवस्थे प्रमाणे वागणे आता जगाला प्रभावित करीत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जग लोकशाहीवादी अमेरिका आणि तुकड्या तुकड्यांमध्ये पसरलेला सोवियत संघ यांच्यात विभाजित झाला होता. या दोन देशांच्या किंवा विचारसरणीच्या मध्ये जे काही अलिप्ततावादी देश होते. त्यांचे नेतृत्व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, झेकोस्लावियाचे मार्शल टिटो आणि इजिप्तचे नासिर हे करत होते. हे गटनिरपेक्ष देश अमेरिका आणि सोवियत संघ दोघांच्याही सत्ता संघर्षामध्ये सहभागी नव्हते. अमेरिकेच्या गोटात पाकिस्तानसह अनेक देश होते. सोवियत संघासोबत ज्या ज्या देशात साम्यवादी आहेत, असे लोक उभे होते. 1990 मध्ये सोवियत संघाचा अवतार संपला. सोवियत संघाने आपले अस्तित्व आता जवळजवळ संपणार आहे. हे मान्य केले. त्यानंतर हळूहळू पोलादी पडद्याआडचा चीन प्रकट झाला आणि पद्धतशीरपणे माओच्या निधनानंतर चीनने कम्युनिस्ट साम्यवादी आवरणाखाली भांडवलशाही व्यवसाय सुरू केले. सध्या जरी चीन एवढा प्रभावी वाटत नसला. तरी तो बराच पुढे गेलेला आहे. हे सर्व जग मान्य करते. अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री किसिंजर यांनी चीन बरोबर बोलणी करून चीनचे महत्त्व जाणले होते. आता या कालखंडात चीन सोवियत संघाचा प्रमुख असलेल्या रशियापेक्षा कितीतरी पुढे गेलेला आहे. सोवियत संघातील आपल्या प्रदेशाचा वेगळा देश या दाव्यावर युक्रेन सोबत लढता लढता रशियाची शक्ती क्षीण होऊ लागली आहे. हे उघड उघड दिसले. आता अशा परिस्थितीमध्ये ट्रम्प आले आणि त्यांनी त्यांना वाटेल त्या प्रकाराने आपले घोडे पुढे दामटले. आता अमेरिकेने जसे आयात शुल्क धोरण राबवले. तोच प्रकार चीनही करणार आहे. त्याची झलक आणि चिन्हे चीनने दाखवूनच दिलेली आहेत. तुम्ही दरवाढ कराल. तर आम्हीही दरवाढ करू शकतो. असा साधा हिशेब आहे. अमेरिकेची दादागिरी जगावर प्रभाव टाकते हे मान्यच आहे. पण या अमेरिकेवर प्रचंड मोठे कर्जही आहे. ही कटू वस्तुस्थिती आहे. या सर्वांमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या मानाने चीन कर्जमुक्त देश आहे. उलट लहानसहान देशांवर सावकारी व्याज लावून चीन अनेक देशांना आपल्या पंज्याखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहे. या युद्धात भारत सध्या तरी कुठे दिसत नाही. अजूनही भारताने सध्या तरी नेहरूकालीन अलिप्ततेचे धोरण स्वीकारलेले दिसते. काल आपला शेअर बाजार चांगलाच आपटला. पण पुन्हा तोट्याची भरपाई करण्यात थोडेफार यश मिळालेले आहे. ही भरपाई पूर्णता होऊ शकत नाही. हे खरे असले तरी पुन्हा घसरण झाली नाही, हे महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत शांततावादी जगाला चीन आणि अमेरिका हे दोन्ही देश वेठीस धरत आहेत. असेच दिसत आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## स्वच्छतेचे काम करणाऱ्या महिलेला २१ लाखांची लॉटरी



■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ८ :
पंढरपुरात एका स्वच्छता कर्मचारी महिलेला पांडुरंगच पावला आहे. या महिलेला 21 लाखांची लॉटरी लागली आहे. पांडुरंगच पावला, अशी भावना मनीषा वाघेला या महिलेने व्यक्त केली आहे.

मनीषा वाघेला यांचे पंढरपूर येथील मेहतर गल्लीत 1010 चे पत्र्याचे छोटे घर आहे. स्वच्छतेचे काम करून कुटुंबाचे उदरनिर्वाह चालते. 21 लाखांची लॉटरी लागल्याने आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

# एमएमआरडीएकडून ४ लाख कोटींचे सामंजस्य करार !

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरला आहे. मुंबई मेट्रोपॉलिटन रीजन डेवलपमेंट अथॉरिटी (एमएमआरडीए) कडून देशातील सर्वात मोठा सामंजस्य करारावर हस्ताक्षर सोहळा पार पडला.

आज एकाच वेळी 4 लाख 7 हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. जियो वर्ल्ड सेंटर येथे आयोजित इंडिया ग्लोबल फोरम 2025 च्या कार्यक्रमात विविध सामंजस्य करार केल्यानंतर ते बोलत होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हुडकोचे अध्यक्ष संजय कुलक्षेत्र, आर ई सी आणि पी एफ सीचे अध्यक्ष परमिंदर चोप्रा, आय आर एफ सी चे संचालक शेली वर्मा, एनएबीएफआयडीचे व्यवस्थापकीय संचालक राजकिरण राय, मॅग्नम आइस्क्रीम कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित भट्टाचार्य, उद्योग विभागाचे सचिव पी अनबलगम उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एमएमआरडीएने विद्युत मंत्रालयाच्या महारत्न कंपनी आरईसी लिमिटेड, पावर फाइनेंस कॉर्पोरेशन, हाऊसिंग एंड अर्बन डेवलपमेंट कॉर्पोरेशन, इंडियन रेलवे फाइनेंस कॉर्पोरेशन, नेशनल बँक फॉर फाइनेंसिंग इन्फ्रास्ट्रक्चर आणि डेवलपमेंट यांसारख्या कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. हे सामंजस्य करार मिनीरत्न, महारत्न आणि नवरत्न कंपन्यांसोबत केल्याने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या करारामुळे एमएमआरमधील इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासाला गती मिळेल.

गेल्या तीन वर्षांत दावोसच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये 20 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आलेत. जे एक मोठे रेकॉर्ड आहे. यावर्षी एमएमआरडीएने दावोसमध्ये साडे तीन लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करून त्याचे पालनही केले आहे. हे सामंजस्य करार मुंबई आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रातील विकासाला एक मोठे चालना देईल.

भारत आता ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर हब म्हणून उभा राहिला असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बंगळुरू, हैदराबाद, पुणे आणि गुरगावमध्ये 1,500 पेक्षा जास्त जीसीसी कार्यरत आहेत. जगभरातील प्रमुख कंपन्या जसे की गूगल, ॲमेझॉन, गोल्डमॅन सॅक्स आणि जेपी मॉर्गन या कंपन्यांचे जीसीसी भारतात कार्यरत आहेत.

पुण्यात आज एक नवीन जीसीसी सुरू करण्यात आले आहे, ज्यामुळे भारताच्या तरुणांना जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांशी काम करण्याचे संधी मिळेल.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स आणि डेटा ॲनालिटिक्स सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात भारताला जागतिक नेता बनवण्याचे संधी उपलब्ध झाली आहे. आणखी 28 ते 30 लाख लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या 5 ट्रिलियन डॉलर लक्ष्याच्या दिशेने हे सर्व उपक्रम महत्त्वाचे आहेत. जीसीसी आणि इतर व्यवसायिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबुती देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्यांच्या योग्य मार्गदर्शनासाठी आणि समर्थनासाठी विशेष आभार व्यक्त करतो. त्यांच्या नेतृत्वाखाली, भारत एक प्रबळ आणि गतिमान अर्थव्यवस्था बनत आहे. आताच्या आणि भविष्यातील इन्व्हेस्टमेंटसाठी महाराष्ट्र एक खुला आणि आकर्षक प्रदेश आहे. यासाठी आपण एकत्र काम करून येत्या काळात यशस्वी होऊ शकतो.

## वक्फ कायद्यावरून पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार



■ वृत्तसंस्था, मुर्शिदाबाद, दि. ८ :
पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये मंगळवारी वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने सुरू असताना हिंसाचार उसळला. निदर्शकांनी अनेक वाहने पेटवून दिली. यामध्ये पोलिसांच्या वाहनांचाही समावेश आहे. निदर्शकांशी झालेल्या संघर्षात अनेक पोलिस जखमी झाले.

मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याविरोधात मुस्लिम संघटना निदर्शने करत होत्या. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि लाठीचार्ज केला. जमाव हिंसक झाला. लोकांनी पोलिसांच्या गाड्या आणि इतर वाहनांना आग लावली. यानंतर घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेने २ एप्रिल रोजी आणि राज्यसभेने ३ एप्रिल रोजी मंजूर केले. १२ एप्रिल रोजी उशिरा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ (दुरुस्ती) विधेयकाला मान्यता दिली आणि त्याचे कायद्यात रूपांतर झाले. सरकारने नवीन कायद्याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली होती.

नवीन कायद्याबाबत आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयात १२ याचिका दाखल झाल्या आहेत. त्याच वेळी, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने ११ एप्रिलपासून देशभरात निदर्शने करण्याची घोषणा केली आहे.

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले होते की, या कायद्याचा उद्देश वक्फ मालमत्तेमध्ये भेदभाव, गैरवापर आणि अतिक्रमण रोखणे आहे. राज्यसभेत १२८ सदस्यांनी या विधेयकाला (आता कायदा आहे) पाठिंबा दिला, तर ९५ सदस्यांनी विरोध केला. हे विधेयक २ एप्रिल रोजी मध्यरात्री लोकसभेत मंजूर झाले. या काळात २८८ खासदारांनी समर्थनात मतदान केले, तर २३२ खासदारांनी विरोधात मतदान केले.

जम्मू-काश्मीर विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्स आणि भाजप आमदारांमध्ये हाणामारी झाली.

जम्मू आणि काश्मीर विधानसभेत मंगळवारी नवीन वक्फ कायद्यावरून गदारोळ झाला. नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) च्या आमदारांनी विधेयकावर चर्चा करण्याची मागणी करत सभागृहात घोषणाबाजी केली. यावेळी, एनसी आणि भाजप आमदारांमध्ये हाणामारी झाली.

नवीन वक्फ कायद्याच्या घटनात्मकतेविरुद्ध जमियत उलेमा-ए-हिंद व्यतिरिक्त ७ एप्रिलपर्यंत सर्वोच्च न्यायालयात ११ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. जमियत उलेमा-ए-हिंदने म्हटले आहे की, आमच्या राज्य युनिट्स देखील या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान देतील.

**मणिपूरमध्ये भाजप नेत्याचे घर जाळले**

नवीन वक्फ कायद्याला पाठिंबा दिल्याबद्दल मणिपूरच्या थौबल जिल्ह्यात भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष असगर अली मक्काम्युम यांच्या घराची जमावाने तोडफोड केली आणि आग लावली.

## माती खचल्याने दोन मजुरांचा मातीखाली दबून मृत्यू

### सिरोंचा तालुक्यातील जामनपल्लीची घटना

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली दि. ८ :
जामपनपल्ली येथील एका शेतकऱ्याच्या शेतात विहिरीचे बांधकाम करीत असताना अचाक विहिरीचा काही खचल्याने काम करीत असलेल्या दोन मजुरांचा मातीखाली दबून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी घडली.

उप्पाला रवी, कोंडा समय्यास अशी मृतक मजुरांचे नाव आहेत. तर सुतोष पुनम रा. जानपद हा मात्र सुखरूप असल्याची माहिती आहे. सिरोंचा तालुक्यातील जामनपल्ली येथील धन्नाडा समाक्का या शेतकऽयाच्या शेतात विहिर खोदकाम सुरू आहेत. सदर विहिरीचे काम 50 खोल झाले होते. त्यानंतर खालच्या भागात काम सुरू असताना अचानक माती कोसळली. सुमारे 10 फुट उंचीची वाळू आणि माती थेट मजुरांच्या अंगावर कोसळल्याने त्यांचा मातीखाली दबून मृत्यू झाला. घटनास्थळी मदतीसाठी गावकरी, पोलीस आणि ग्रामपंचायतीकडून शतीर्चे प्रयत्न सुरू झाले, मात्र दुर्दैवाने दोघांनाही वाचवण्यात अपयश आले.

या घटनेनंतर अख्या गावातील लोक एकवटले. जेसीबी मशीन, फावडे, बादल्या, दोरखंड वापरून माती काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन, आणि बचाव पथक यांनीही अथक प्रयत्न केले. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी संदेश नाईक पोहचून पंचनामा करून दोन्ही मृत्यूदेहाचे शवविच्छेदन करून कुटुंबीयांच्या सुपूर्द केल्याची माहिती आहे. पुढील तपास सिरोंचा पोलिस करीत आहेत.

सर्व यंत्रणांच्या प्रयत्नांनंतरही दोघांना वाचवणे शक्य झाले नाही. ही घटना केवळ दुर्दैवाची नसून ग्रामीण भागातील शेतकऽयांच्या संघषार्चे आणि असुरक्षित कामाच्या पद्धतीचे प्रतीक आहे. शासनाने अशा घटनांपासून धडा घेऊन शेतकऱ्यांसाठी सुरक्षित विहीर खोदकाम योजना आणि योग्य मार्गदर्शन देणे गरजेचे ठरत आहे.

## घरकुलांसाठी ५ ब्रास वाळू मोफत

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :
राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत राज्यभरातील घरकुलांसाठी 5 ब्रास वाळू मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण घेण्यात आला. या प्रकरणी राज्यातील प्रत्येक वाळू घाटात 10 टक्के आरक्षण हे घरकुलांसाठी असेल. विशेषतः ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामपंचायतींनाही पुढील कारवाई करावी लागेल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणी सांगितले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारची आज मंत्रिमंडळ बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या बैठकीतील निर्णयांची माहिती देताना म्हणाले की, आता राज्यभरातील घरकुलांसाठी 5 ब्रास मोफत वाळू मिळेल. या प्रकरणी प्रत्येक वाळू घाटात 10 टक्के वाळू ही घरकुलांसाठी आरक्षित असेल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामपंचायतींना पुढची कारवाई करायीच आहे. मंत्रिमंडळाच्या पुढच्या बैठकीत नैसर्गिक वाळू देण्याचे धोरण आणले जाईल. एम सँड म्हणजे कृत्रिम वाळू तयार केली जाईल. सरकारी बांधकामात एम सँड वाळूच वापरली जाईल. त्यामुळे नदीच्या वाळूची गरज पडणार नाही. ही वाळू दगड व गिट्टीपासून तयार केली जाईल. यासाठी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये 50 एम सँड क्रशर निर्मिती स्थापन केली जाईल.

यापुढे आता नदी विभागासाठी 2 वर्षांसाठी आणि खाडी पात्रासाठी 3 वर्षांसाठी लिलाव पद्धतीने वाळू उपसा दिला जाणार आहे. सरकारने राज्यातील मोठ्या प्रकल्पातील वाळू उपसा करण्याचाही निर्णय घेतला आहे.

**मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय**

**मंत्रिमंडळातील निर्णय**

नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार

------------

राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-2025 जाहीर

------------

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती -

------------

वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय

------------

सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण

------------

नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार

------------

शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू

## मुंबईत आकाशवाणी आमदार निवासात कार्यकर्त्याच्या वडिलांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासात आज एका धक्कादायक घटनेत आमदार विजय देशमुख यांचा कार्यकर्ता विशाल धोत्रे यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आमदार निवासात खळबळ उडाली असून, योग्य वेळेत रुग्णवाहिका न मिळाल्याने हा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

विशाल धोत्रे हे आपल्या वडिलांसह एका बैठकीसाठी आमदार विजय देशमुख यांच्यासोबत मुंबईत आले होते. आज सकाळी आकाशवाणी आमदार निवासात असताना विशाल यांच्या वडिलांची अचानक तब्येत बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यासाठी रुग्णवाहिकेची मागणी करण्यात आली, परंतु रुग्णवाहिका वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. परिणामी, त्यांना उपचार मिळण्यास उशीर झाला आणि त्यांचा मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, रुग्णवाहिकेसाठी अनेक फोन केले गेले, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. या घटनेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होत असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणावर टीका होत आहे. आमदार विजय देशमुख यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
निवडणूक आयोगाने महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राज ठाकरे यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिकाही दाखल करण्यात आली आहे.

हिंदी भाषिकांवर मनसे कार्यकर्ते हल्ले करत असल्याचा उल्लेख या याचिकेत करण्यात आला आहे. उत्तर भारतीय विकास सेना प्रमुख सुनील शुक्ला यांनी ही याचिका दाखल केली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा न बोलणाऱ्या उत्तर भारतीयांविरुद्ध कथित द्वेषपूर्ण भाषण, लक्ष्यित हिंसाचार आणि धमक्यांसंबंधी अनेक प्रकरणांमध्ये कारवाईची मागणी करणारी याचिका मनसेविरोधात दाखल करण्यात आली आहे.



**राज ठाकरेंना मोठा धक्का**

ही याचिका मुंबईतील रहिवासी आणि महाराष्ट्रात नोंदणीकृत राजकीय पक्ष उत्तर भारतीय विकास सेनाचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी न्यायालयात दाखल केली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे.

ॲड. श्रीराम परक्कट यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत सुनील शुक्ला आणि इतर हिंदी भाषिक लोकांविरुद्ध द्वेषपूर्ण भाषणाचे अनेक खटले दाखल असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राज ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यासोबतच, मनसेची मान्यता रद्द करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनुसार, सुनील शुक्ला यांना गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रात त्यांच्या राजकीय ओळखीमुळे आणि उत्तर भारतीय हक्कांच्या वकिलीमुळे अनेक गंभीर धमक्या आणि छळ तसेच शारीरिक धमक्यांचा सामना करावा लागला आहे. या धमक्या आता सार्वजनिक हिंसाचार आणि शारीरिक हल्ल्यांपर्यंत वाढल्या आहेत, असा आरोपही याचिकाकर्त्याने केला आहे.

राजसाहेब तुम्ही केवळ उत्तर भारतीयांचे नव्हे तर मराठी लोकांचेही विरोधत आहात. म्हणून याचिका दाखल केली आहे, असे शुक्ला म्हणाले.

## क्रिकेटपटू केदार जाधवची भाजपसोबत नवी इनिंग



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
क्रिकेटपटू केदार जाधव याने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. यावेळी भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.

केदार जाधवचे भाजपमध्ये येणे हे आमच्यासाठी खूप आनंद देणारे आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुक समोर ठेवत भाजपने पक्ष वाढवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

## पोलिस कर्मचाऱ्याचे अख्खे कुटुंब ठार

**रामनवमी कार्यक्रमावरून परताना भीषण अपघात**

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ८ :
शहरातील पोलिस कर्मचारी व त्यांचा परिवार चारचाकी वाहनाने मांडगाव येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त महाप्रसादाच्या कार्यक्रमाला गेले होते. परतीचा प्रवास करत असताना जंगली जनावराला वाचवण्यासाठी त्यांचे वाहन दुभाजकाला धडकले आणि त्या भीषण अपघातात त्यांची पत्नी व मुलगा जागीच ठार झाले तर पोलिस कर्मचारी व त्यांची मुलगी गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचीही प्राणज्योत मालवली. ही घटना रात्रीच्या सुमारास मांडगाव येथील मार्गावर घडली.

प्रियंका वैद्य व श्रेयस वैद्य अशी मृतांची नावे आहेत. शहरातील प्रशांत मधुकर वैद्य (४५) रा प्रताप नगर वर्धा हे वडनेर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असून दिनांक ७ एप्रिल रोजी मांडगाव येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाकरिता प्रशांत वैद्य त्यांची पत्नी प्रियंका वैद्य वय (३७) मुलगा श्रेयस वैद्य व्यव (६) मुलगी माई वय (३) हे चौघेही स्विफ्ट डिझायर चार चाकी वाहनाने मांडगाव येथे केले होते. महाप्रसादाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर परतीचा प्रवास करीत असताना मांडगाव जवळच रस्त्याच्या मधोमध त्यांच्या वाहना समोर एक जंगली जनावर आले आणि त्या जनावराला वाचविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचे वाहन दुभाजकाला धडकले.

या भीषण अपघातात त्यांची पत्नी प्रियंका व मुलगा श्रेयस या दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला तर प्रशांत वैद्य व त्यांची मुलगी माई हे दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचाही मृत्यू झाला. ही घटना रात्री साडेदहा वाजताच्या दरम्यान घडली. भीषण अपघात घडल्याची माहिती ग्रामस्थांना मिळतात त्यांनी तात्काळ पोलीस व रुग्णवाहिकेला पाचारण केले.

जखमींना तातडीने सेवा ग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तीन वर्षीय मुलीवर रुग्णालयात उपचार सुरू होते तर प्रशांत वैद्य गंभीर जखमी असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता त्यांचाही मृत्यू झाला अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# उच्च न्यायालयाने बजावली राज्य सरकारला नोटीस

### सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण : वंचितचे नेते प्रकाश आंबेडकरांनी मांडली कुटुंबीयांची बाजू

■ वृत्तसंस्था, परभणी, दि. ८:
परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा न्यायालयीन कोठडी मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते.

परंतु, सोमनाथ मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले होते. सव्वातीन महिन्यांनंतर आता सोमनाथ सूर्यवंशींच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडी कडे वर्ग करण्यात आला आहे.

सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यावर आज सुनावणी झाली. विशेष म्हणजे यात कुटुंबीयांची बाजू वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मांडली. आता या प्रकरणात उच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. तसेच पुढील सुनावणी 29 एप्रिल रोजी होणार आहे.

सोमनाथ सूर्यवंशी याचा 16 डिसेंबर 2024 रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडाधिका?्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार असला, तरी आम्हाला न्याय हवाय, अशी मागणी सोमनाथच्या कुटुंबीयांनी केली आहे. आता न्यायमूर्ती तेलगावकर यांच्या अहवालातही पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे

.मात्र तरीही सरकार न्याय देत नाही . जे जे दोशी आहे तर त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. सोमनाथच्या कुटुंबीयांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे .जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत लढतच राहणार असल्याचे सोमनाथच्या आई आणि भावाने म्हटले आहे.

**मानवाधिकार आयोगासमोर अहवाल सादर**

सूर्यवंशी हत्या प्रकरणी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या 451 पानी गोपनीय



अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला. आयोगाने संबंधित सर्व पोलिसांना नोटिसा बजावून उत्तर मागितले आहे. मानवाधिकार आयोगाने याप्रकरणी राज्याचे मुख्य सचिव, गृह सचिव, अतिरिक्त पोलिस महासंचालक (गुन्हे), परभणी सीआयडीचे पोलिस उपअधीक्षक यांनाही नोटीस बजावली आहे. तर परभणी जिल्ह्यातील नवा मोंढा पोलिस ठाण्यात मारहाण करण्यात आली, असा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांच्या चौकशीतून काढला आहे.

**सूर्यवंशी मृत्यू प्रकरणावर मुख्यमंत्र्यांचे नव्याने स्पष्टीकरण**

सोमनाथचा मृत्यू श्वसनाच्या विकाराने झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. तसेच त्याच्या शरीरावरील जखमाही जुन्याच असल्याचे म्हटले होते.

शवविच्छेदन अहवाल आणि न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवाल आल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सुधारित स्पष्टीकरण दिले. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या संदर्भात पोस्टमार्टमचा रिपोर्ट वेगळा आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट जेव्हा करतो तेव्हा व्हिसेरा बाजूला ठेवलेला असतो. हा रिपोर्ट वेगळा असतो. आता व्हिसेराच्या अंतिम अहवाल हातात आला आहे. व्हिसेरा रिपोर्ट आणि पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये वेगवेगळी माहिती समोर आली आहे' असे फडणवीस म्हणाले.

आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी रिपोर्ट दिले त्यांनी पोस्टमार्टमच्या रिपोर्ट नुसार माहिती दिली आहे. जस्टीस अंचलिया समिती नेमली आहे. जर सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांमुळे मृत्यू झाला असेल, तर व्हिसेरा रिपोर्ट बाजूला ठेवूया, मागे पुढे न पाहता पोलिसांवर कारवाई केली जाईल. समितीने सांगितलं तर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली होती. नव्या अहवालामुळे विरोधकांना संधी मिळाली असून आता हे प्रकरण पुन्हा तापणार असल्याचे दिसून येत आहे.

## तनिषा भिसेंचा मृत्यू नव्हे तर हत्या



■ **मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पीडित भिसे कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना तनिषा भिसे या महिलेचा मृत्यू झालेला नसून तिची हत्या झाली आहे, असे म्हटले आहे. या प्रकरणात सरकारने काहीतरी संवेदनशीलपणा दाखवत कारवाई केली पाहिजे. एका समितीचा अहवाल आला आहे. सरकार आणखी दहा समित्यांचा अहवाल घेणार का? असा संताप व्यक्त केला.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि तनिषा भिसे मृत्यू प्रकरण राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. याप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर चौफेर टीकेची झोड उठली आहे. याचदरम्यान, डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. डॉक्टर घैसास यांच्या राजीनाम्यामुळे कोणताही प्रश्न सुटत नसल्याचा दावा त्यांनी केला.

तनिषा भिसे यांचा मृत्यू झालेला नसून त्यांची हत्या करण्यात आली आहे. डॉ. घैसास यांनी राजीनामा दिला म्हणजे काय झाले? आम्हाला राजीनामा नकोय. आम्हाला सरकारकडून तातडीने कारवाई हवी आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. या मृत्यू प्रकरणाचा अहवाल आलेला आहे. या अहवालातून रुग्णालय प्रशासनाची चूक आहे, हे दिसत आहे. त्यामुळेच या प्रकरणात समावेश असलेल्या सर्वांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. एका समितीचा अहवाल आला, सरकार दहा समित्यांचा अहवाल घेणार का? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

## दिनानाथच्या घटनेची कल्याणमध्ये पुनरावृत्ती?

**पुणे :** पुण्यातील दिनानथ मंगेशकर हॉस्पिटलच्या हलगर्जीपणामुळे एका गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागल्याचा आरोप होत आहे. हे प्रकरण ताजे असतानाच, आता असाच प्रकार कल्याणमध्येही घडल्याचे समोर येत आहे. कल्याण पूर्वेतील शक्तीधाम प्रसूतीगृहात उपचारादरम्यान गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. शांतीदेवी अखिलेश मौर्य असे मृत महिलेचे नाव आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या कल्याण पूर्वेतील शक्तीधाम प्रसूतीगृहात शांतीदेवी अखिलेश मौर्य या महिलेला गर्भपात आणि कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यासाठी दाखल करण्यात आले होते. तिची शस्त्रक्रिया करण्यापूर्वीच तिची प्रकृती खालावली, तिला इंजेक्शन दिले गेले. मात्र तिला प्रसूतीगृहातून खाजगी रुग्णालयात नेत असताना तिचा वाटेत मृत्यू झाला. महिलेच्या मृत्यूस प्रसूतीगृहातील डॉक्टर जबाबदार असल्याचा आरोप महिलेच्या पतीसह तिच्या कुटुंबियांनी केला आहे.

माझ्या पत्नीला स्टोनचाही त्रास होता. डॉक्टरांना याबाबत जाब विचारला असता त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहे. प्रसूती गृह असलेल्या या रुग्णालयात आयसीयू देखील नसल्याचे समोर आले आहे. दोन महिन्यापूर्वी डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात सुवर्णा सरोदे या गरोदर महिलेचा प्रसूती दरम्यान मृत्यू झाला होता.

## भाजपच्या विचारांचे सर्वच लोक राहू-केतू

### संजय राऊत यांची टीका



**मुंबई :** जिथे भाजपच्या विचारांचे लोक ते सर्वच राहू - केतू असल्याची टीका उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्यावर देखील त्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. शिंदेंनी लूट केली म्हणून अधिकाऱ्यांनीही लूट केली, असा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे आता नगर विकास खात्यातील लुटीची चौकशी करण्याची मागणी देखील संजय राऊत यांनी केली आहे.

केंद्र सरकारच्या वतीने महागाई मध्ये अजून तेल ओतले जात असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. गॅस सिलिंडर चारशे रुपयांनी स्वस्त व्हायला हवा होता. मात्र गॅस सिलिंडर महाग केला जात आहे. त्यामुळे आता केंद्र सरकार विरुद्ध आंदोलनाचे नेतृत्व स्मृती इराणी यांनी करावे, अशी मागणी देखील संजय राऊत यांनी केली आहे. देशात सर्वसामान्यांची लूट केली जात आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयांचे मूल्य घसरले आहे. जागतिक पातळीवर कच्च्या तेलाचे दर कमी होत असताना पेट्रोल डिझेल दर स्थिर झाले पाहिजे, असे मागणी देखील संजय राऊत यांनी केली आहे. पेट्रोल डिझेलचा दर पन्नास रुपये लिटर पर्यंत स्थिर व्हायला हवा, अशी मागणी त्यांनी केली.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्या आहेत. मग भारतात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरच्या किमती का वाढवाव्यात? ही कोणती पाकीट मारी किंवा वसुली सुरू आहे का? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यानंतर देखील भारतीयांना दिलासा मिळत नसेल तर निर्मला सीतारामन या महागाईत तेल ओतण्याचे काम करत आहेत. आता सिलिंडर देखील 50 रुपयांनी वाढवला आहे. लाडक्या बहिणीचे बजेट यामुळे कोलमडले असल्याची टिका राऊत यांनी केली आहे.

## मंगेशकरांना जमीन दान दिल्याचा पश्चाताप

**पुणे :** तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय वादात सापडल्यानंतर आता या रुग्णालयाला जमीन दान देणाऱ्या कुटुंबातील एका सदस्याने आपल्या निर्णयावर खंत व्यक्त केली आहे. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रकरणामुळे मी पुन्हा - पुन्हा इतिहासात जात आहे. पूर्वी घेतला गेलेला चुकीचा निर्णय पुन्हा सुधारता येऊ शकला असता तर...?, अशी जाहीर खंत खिलारे कुटुंबातील सदस्या डॉक्टर नयना सोनवणे -खिलारे यांनी व्यक्त केली आहे.

दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या जागेसोबत आमच्या लहानपणच्या आठवणी जोडल्या गेल्या आहेत, ती 6 एकर जागा आणी त्याच्या बाजूच्या हिमाली आणी संकुल सोसायटी हा पूर्ण पट्टा आमची ( खिलारे कुटुंबाची) शेती होती. आमचे काका अमृतराव व कै. काशिश्वर खिलारे हे तीथे शेती करत होते. त्यांनीही या प्रस्तावास लगेच मान्यता दिली. शरद पवार, विलासराव देशमुख हे माझे वडील पुण्याचे माजी महापौर दि. ज. खिलारे यांचे मित्र होते. लता मंगेशकर या पुणे शहरामध्ये हॉस्पिटलसाठी जागा शोधत होत्या. तशी इच्छा त्यांनी शरदरावांना बोलून दाखवली. पवार यांच्या सांगण्यावरून ती जागा दिली गेली, पण आता पश्चाताप होतो, असे नयना म्हणाल्या.

## सर्व शाळांमध्ये घुमणार जय जय महाराष्ट्र माझा

### महाराष्ट्र शासनाचा नवा शासन निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १:**
महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये आता राष्ट्रगीत, परिपाठ, प्रार्थना आणि प्रतिज्ञेसोबतच राज्य गीत जय जय महाराष्ट्र माझा अनिवार्यपणे घुमणार आहे. राज्य सरकारने यासंदर्भात नवा शासन निर्णय (जीआर) जारी केला असून, जय जय महाराष्ट्र माझा हे गीत राज्य गीत म्हणून शाळांमध्ये वाजवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

हा निर्णय सर्व शासकीय, खासगी आणि सर्व बोर्डांच्या (सीबीएसई, आयसीएसई, आंतरराष्ट्रीय) शाळांना लागू असेल, असे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

जय जय महाराष्ट्र माझा हे गीत कवी राजा निळकंठ बढे यांनी लिहिले असून, संगीतकार श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केले आहे. हे गीत १ फेब्रुवारी २०२३ रोजी राज्याचे अधिकृत राज्य गीत म्हणून घोषित झाले होते. आता शाळांच्या दैनंदिन सभेत राष्ट्रगीतानंतर या गीताच्या दोन ओळी (१०१ सेकंद) गायल्या जाणार आहेत. या निर्णयामागे विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान आणि जागरूकता निर्माण करणे हा उद्देश आहे, असे शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांनी सांगितले.

हा शासन निर्णय १४ जानेवारी २०२५ रोजी जाहीर झाला होता, परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी येत्या शैक्षणिक सत्रापासून होणार आहे. यामुळे शाळांमध्ये मराठी भाषा आणि राज्य गीताचा प्रभाव वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. हा निर्णय म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. यातून नव्या पिढीला आपल्या राज्याबद्दल अधिक माहिती मिळेल, असे भुसे म्हणाले. तथापि, काही शिक्षणतज्ज्ञांनी यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. या निर्णयाचे स्वागत करताना काहींनी याला राजकीय रंग असल्याचा दावाही केला आहे. तरीही, सरकारने हा सांस्कृतिक पाऊल असल्याचे ठामपणे सांगितले आहे.

## क्रीडाधिकाऱ्याने घेतली १ लाखाची लाच

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. ८:**
९५ लाख रुपयांच्या दोन कामांच्या थकीत बिलापोटी १ लाख रुपयांची लाच घेताना परभणी जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे-निंबाळकर आणि ५० हजार रुपयांची लाच घेताना क्रीडा अधिकारी नानकसिंह बस्सी यांना गुरुवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने (एसीबी) रंगेहाथ पकडले.

मानवत येथील तक्रारदाराने २०२४ मध्ये क्रीडा स्पर्धा आयोजनाचे ५ लाखांचे बिल तसेच जलतरण तलावाच्या बांधकामाचे ९० लाखांचे बिल कविता नावंदे यांच्या कार्यालयात प्रलंबित होते. ३ मार्चला तक्रारदार हे बिल मंजूर करून घेण्यासाठी कविता नावंदे व क्रीडा अधिकारी बस्सी यांना भेटले. त्या वेळी नावंदे यांनी स्वतःसाठी दोन लाख, तर क्रीडा अधिकारी बस्सी यांच्यासाठी ५० हजार अशी एकूण अडीच लाख रुपये लाच मागितली. तक्रारदाराने नावंदे यांना १३ मार्चला एक लाख रुपये बस्सी यांच्या समक्ष दिले. उर्वरित दीड लाख देण्यापूर्वी तक्रारदाराने २४ मार्चला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. २५ मार्चला पडताळणी केली असता फक्त कविता नावंदे यांची भेट झाली. तक्रारदाराने प्रलंबित लाचेसंदर्भात बोलले असता त्यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना सांगितले की, बस्सी सर येतील, ते करून टाका. असे म्हणून उर्वरित लाच स्वीकारण्यास सहमती दर्शवली.

पडताळणीत कविता नावंदे यांनी स्पष्टपणे रक्कम सांगितली नसल्याने २७ मार्चला सापळा रचण्यात आला. त्यावेळी नानकसिंग बस्सी यांनी स्वतःसाठी ५० हजार रुपये आणि कविता नावंदे यांनी त्यांच्यासाठी एक लाख रुपये लाचेची मागणी केली. तसेच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवून तक्रारदाराला नावंदे यांच्या दालनात नेले. लाच स्वीकारताच बस्सी व नावंदे यांना ताब्यात घेतले. नवा मोंढा पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## पुढील सुनावणी १६ एप्रिल रोजी

### कुणाल कामरा प्रकरण



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर विडंबन कविता करून वादाच्या भोवऱ्यात सापडलेला स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने मुंबई, नाशिक, जळगावात दाखल झालेले गुन्हे रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याच्या याचिकेवर आज तातडीची सुनावणी झाली आहे.

या प्रकरणात आता पुढील सुनावणी ही 16 एप्रिल रोजी होणार आहे. तत्पूर्वी, मद्रास उच्च न्यायालयाने त्याचा अंतरिम अटकपूर्व जामीन 17 एप्रिलपर्यंत वाढवला आहे. मुंबई पोलिस अटक करतील या भीतीने त्याने मद्रास हायकोर्टात अर्ज केला होता. तो तामिळनाडूत वास्तव्य करून आहे.

कुणाल कामरा यांनी या संदर्भात शिवसेनेने दाखल केलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे. या विषी कामरा याच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, माज्या अशिलाने मुंबई पोलिसांमोर हजर राहण्यासाठी असलेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे निवेदन देण्याची तीनदा विनंती केली आहे. मात्र, तरी देखील पोलिस अधिकारी प्रत्यक्ष उपस्थितीचा आग्रह धरत आहेत.

## लाडकी बहीण योजनेचा एप्रिल हप्ता ३० एप्रिलला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत एप्रिल महिन्याचा हप्ता लाभार्थ्यांना ३० एप्रिल २०२५ रोजी मिळणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. हा हप्ता अक्षय तृतीया या सणाच्या शुभ मुहूर्तावर वितरित होणार असून, यामुळे राज्यातील कोट्यवधी महिलांना आर्थिक आधार मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. लाडकी बहीण योजनेचा हप्ता नियमितपणे वितरित करण्याचे सरकारचे धोरण आहे. एप्रिल महिन्याचा हप्ता अक्षय तृतीयेच्या शुभदिनी म्हणजेच ३० एप्रिलला जमा होईल, असे त्यांनी सांगितले. या योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना मिळत असून, त्यांच्या आरोग्य आणि पोषणासाठीही हातभार लागत आहे.

या योजनेसाठी आतापर्यंत २.५२ कोटी महिलांनी नोंदणी केली असून, जानेवारी आणि फेब्रुवारीचे हप्तेही मार्च महिन्यात वितरित झाले होते. एप्रिलचा हप्ता वेळेवर मिळावा यासाठी प्रशासनाने बँकांशी समन्वय साधला आहे. लाभार्थ्यांना हा हप्ता त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरित केला जाईल.

अक्षय तृतीया हा सण संपन्नतेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे या दिवशी हप्ता जमा होणे, हे लाभार्थ्यांसाठी आनंदाचे आणि शुभेच्छांचे कारण ठरणार आहे. ह्रहा निर्णय महिलांना सणासुदीच्या काळात आर्थिक मदत देण्यासाठी घेण्यात आल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

: मुलखावेगळी माणसं :

## टाकाऊतून टिकाऊ काचेच्या कलाकृती



आपल्या घरामध्ये अनेकदा अनेक प्रकारच्या टाकाऊ वस्तू असतात आपण ज्याला कचरा म्हणून अक्षरशः केराच्या डब्यात फेकून देतो. परंतु याच टाकाऊ वस्तू एखाद्या जाणकार कलाकारासाठी अत्यंत महत्वाच्या ठरतात आणि अशाच टाकाऊ वस्तूमध्ये कलेचा शोध घेत तो कलावंत चक्क अशा टाकाऊतून टिकाऊ अशा कलाकृती घडवतो तेंव्हा आपण अगदी थक्क होतो.

२९ वर्षाचे विद्या भट आणि तिचे पती सुश्रुत केएस हे जोडपं असच मुलखावेगळं आहे. त्यांनी कचऱ्यात फेकून दिलेल्या काचेच्या बाटल्यापासून काही सुशोभित कलाकृती तयार करता येतील का? यावर बराच विचार केला आणि अशा काचेच्या बाटल्यांचे रूपांतर त्यांनी सुंदर अशा कलाकृतीमध्ये करून दाखवले आहे.

भट दाम्पत्य प्रामुख्याने सरळ बाटल्या ज्यामध्ये आपण एलईडी लाईट घालतो अशा बाटल्या आणि दुसऱ्या उलट्या बाटल्या ज्या स्टॅंडसह असतात अशा बाटल्यापासून कलाकृती तयार करतात. खरं तर विद्या हा एक बायोमेडिकल इंजिनिअर होता. त्याच्या कलेवर असलेल्या प्रेमापोटी आणि आवडीमुळेच चित्तरा नावाचा व्यवसाय सुरु केला. छंद म्हणून सुरु झालेला त्यांचा हा व्यवसाय आता पूर्णवेळ व्यवसाय बनलेला आहे. चित्तरा म्हणजे कला आणि डिजाईन जे या कलाकृती मागील मुख्य गाभा आहे. अगदी सुरवातीला विद्याने घरात पडलेल्या एका अमूल कुलच्या रिकाम्या बाटलीत अतिशय सुंदर असे रंग भरले आणि तिथूनच मग या आगळ्यावेगळ्या कलेची सुरवात झाली. एका प्रदर्शनात देखील त्यांनी या बाटलीची कलाकृती सादर केली ज्याला चाहत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

विद्या आणि सुश्रुत ग्राहकांनी दिलेल्या ठराविक बाटल्यावर देखील रंगीत कलाकृती सादर करतात. अनेकदा वेळ मिळाला कि हे दाम्पत्य समुद्र किनारी जाऊन तिथे मिळणाऱ्या बाटल्या देखील घेऊन येतात आणि कलाकृती साकारतात. या बाटल्यांवर अतिशय सुंदर अशा रंगांच्या विविध कलाकृती सादर केल्या जातात.

विशेष म्हणजे या काचेच्या कलेचे या दोघांनी प्रशिक्षण घेतलेले नाही. केवळ अनुभवातून ते हे काम करतात. मागील पाच वर्षात या दोघांनी सुमारे ३५० पेक्षा अधिक कलाकृती काचेच्या बाटल्यावर केल्या आहेत ज्या रात्रीच्या दिव्यामध्ये देखील रूपांतरित झालेल्या आहेत. ज्या रंगकाम केलेल्या बाटलीत लाईट नसते अशी बाटली ३०० रुपये तर लाईटसह असलेल्या बाटलीची किंमत १००० रुपयापासून सुरु होते.

लोकमानस

हे दाम्पत्य त्यांच्या या अनोख्या कलाकृतीची जाहिरात आणि मर्केटिंग फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्स ॲप या सामाजिक माध्यमातून करत असतात. अर्थात वेगवेगळ्या प्रदर्शनांमधून देखील त्यांच्या या काचेच्या बाटलीपासून तयार केलेल्या अनोख्या कलाकृती रसिकांसमोर येतात. एकूणच, टाकाऊ काचेच्या बाटल्यापासून सुशोभित रंगीबेरंगी कलाकृती तयार करणाऱ्या भट दाम्पत्याची ही जगावेगळी कला दखलपात्रच ठरते. ■ ■ ■

: वाद संवाद :

## ट्रम्प धोरणाचे दुष्परिणाम भारताला देखील भोगावे लागणार का?

**शशांक गुलगुले, अर्थतज्ज्ञ**

अगदी अलीकडेच अमेरिकेत पार पडलेल्या सार्वजनिक निवडणुकांनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची सूत्र हाती घेतली. आणि त्यानंतर लगेचच एकामागून एक आर्थिक धोरण जाहीर करायला सुरवात केली. चीन आणि भारत देशाच्या निर्यातीवर त्यांनी २८ टक्के इतके वाढीव निर्यात शुल्क लादल्याने मागील काही सप्ताहापासून याचे भारतीय आणि जगभरातील शेअर बाजारावर तीव्र पडसाद उमटू लागलेले दिसतात. गुंतवणूकदार बाजारातून गुंतवणूक मोठ्या प्रमाणात काढून घेत आहेत. शिवाय याचाच परिणाम म्हणजे आपल्याकडे घरगुती गॅस सिलिंडर,पेट्रोल चे दर देखील वाढलेले आहेत. पयार्याने महागाईचा भडका उडणार आहे आणि एकूणच ट्रम्प यांच्या या धोरणामुळे आपल्या देशाला भयानक अशा आर्थिक मंदीला सामोरे जावे लागणार आहे.

**समीर अत्याळकर, शेअर मार्केट अभ्यासक**

नवनिर्वाचित अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनपेक्षित अशा आर्थिक धोरणामुळे सध्या जगभरातील शेअर बाजार अगदी दयनीय अवस्थेत आहेत. त्याचवेळी प्रचंड महागाई आणि पर्यायाने बेकारी वाढणार आहे हेही वास्तव आहे. परंतु ही स्थिती काही काळ राहील. अचानक एखाद्यावेळी काळा ढग सूर्यप्रकाशाला झाकोळतो आणि अल्पवाढीतच पूर्ववत होतो त्याप्रमाणेच आपल्या देशात मंदीचे वातावरण असले तरी अर्थमंत्र्यांनी आणि पंतप्रधानांनी देशाच्या आर्थिक स्थितीला पूर्ववत करण्यासाठी काही निर्णय घेतले तर हि परिस्थिती देखील नक्कीच बदलेल आणि तेजीचे वारे वाहतील. ■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## अर्बन क्रुझर हायराइडरचे अद्ययावत फीचर्स

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने घोषणा केली की त्यांनी अर्बन क्रूझर हायराइडरमध्ये सुरक्षा, आराम आणि सोयीची पुनर्परिभाषा देणारे फीचर अपग्रेड सादर केले आहेत. नवीनतम सुधारणा ग्राहक-केंद्रित नवोपक्रमासाठी टोयोटाची वचनबद्धता अधोरेखित करतात,




मौल्यवान अभिप्राय अखंडपणे समाविष्ट करतात आणि ड्रायव्हिंग अनुभव उंचावण्यासाठी बाजारपेठेतील ट्रेंड विकसित करत आहेत.भारतातील पहिली सेल्फ-चार्जिंग स्ट्रॉंग हायब्रीड इलेक्ट्रिक एसयूव्ही म्हणून व्यापकपणे प्रसिद्ध आणि स्वीकारली जाणारी, अर्बन क्रूझर हायराइडरने आधीच १ लाख विक्रीचा टप्पा ओलांडला आहे. ती तिच्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाने, अपवादात्मक इंधन अर्थव्यवस्था, गतिमान कामगिरीने आणि प्रीमियम ड्रायव्हिंग अनुभवाने मने जिंकत आहे.

अर्बन क्रूझर हायराइडरच्या प्रमुख बदलांमध्ये हे समाविष्ट आहे.

सुधारित सुरक्षिततेसाठी सर्व प्रकारांमध्ये स्ट्रक्चरल सुधारणा सादर करण्यात आल्या आहेत. प्रवाशांची सुरक्षा वाढवणारी खात्री करून, सर्व प्रकारांमध्ये आता ६ एअरबॅग्ज मानक आहेत. अधिक सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी काही प्रकारांमध्ये ऑटोमॅटिक ट्रान्समिशनमध्ये इलेक्ट्रॉनिक पार्किंग ब्रेक (EPB) जोडण्यात आला आहे. ■ ■ ■

## काँग्रेसच्या नेत्याचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:**
काँग्रेस पक्षाचे सहदेव बेटकर यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. सहदेव बेटकर यांनी मातोश्री येथे जाऊन पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश केला आहे. सहदेव बेटकर हे रत्नागिरी येथील काँग्रेस नेते असून त्यांनी आता शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. यावेळी खासदार संजय राऊत तसेच विनायक राऊत उपस्थित होते.



उद्धव ठाकरे म्हणाले, संजय राऊत म्हणाले की कोकणात एक पाऊल ठेवा, मी सांगतो केवळ पाय नाही तर पूर्ण कोकणच पुन्हा मिळवणार आहे. बघू कोण आडवा येतो ते. कोकणातील निकाल अनपेक्षित होता. आम्हाला फसवले गेले, आता खरी गरज या शिवसेनेची गरज महाराष्ट्राला आहे. दिलेला शब्दाला पाळणारी केवळ शिवसेना आहे. शिवसेना एकच आहे, दुसरी आहे ती कोण आहे एसंशी! स्वतःच्या स्वाथार्साठी गेलेली ही माणसे आहेत. माज्यासोबत जी आहेत ती सर्वसामान्य माणसे आहेत.

आपापसात जे काही कुरघोडी झाल्या तरी पक्ष सोडून जाऊ नका, असा सल्ला देखील उद्धव ठाकरे यांनी यावेळी सहदेव बेटकर यांना दिला आहे. तसेच उद्धव ठाकरे हे येत्या काळात महाराष्ट्राचा दौरा करणार असल्याचे देखील त्यांनी जाहीर केले आहे. कोकणासाह संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा भगवा फडकवायचा आहे, असेही ठाकरे यावेळी म्हणाले.

यावेळी बोलताना संजय राऊत म्हणाले, आज सगळे कोकणचे सुपुत्र येथे हजर आहेत, त्यात भर पडली आहे आता सहदेवाची. इथे महाभारतातली सगळी पात्र उपस्थित आहेत. आता कुरुक्षेत्राचे युद्ध आपण जिंकणार आहोत. मी उद्धव साहेबांना इतकेच सांगेल, आपण फक्त कोकणात एक दौरा करा. आपण कोकणच्या भूमीवर पाय ठेवा, मग बघा. गद्दारांना त्यांची जागा दाखवून देऊ.

सहदेव बेटकर यावेळी म्हणाले, मातोश्रीवर 1992 साली मी मोठ्या साहेबांचे दर्शन घेतले होते. मी तुम्हाला सांगू इच्छितो की मी नाराज नाही. मी माझ्या घरात वापस आलो आहे. विनायक राऊत यांच्या आशीर्वादाने मी येथे आलो असल्याचेही ते म्हणाले.

महासागर ●बुधवार,दि.९ एप्रिल २०२५

अकोला पान ३

## घरफोडी करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला

**अकोट :** हिवरखेड पोलिस अंतर्गत घरफोडी प्रकरणातील आरोपी सलमान खा अमीर खा याचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला. आरोपी सलमान खाँ. अमीर खाँ राहणार इंदिरा नगर हिवरखेड याने तेल्हारा तालुक्यातील दिवानझरी गावातील रहिवासी व या प्रकरणातील फिर्यादी यासीनबेग वकीलबेग बाहेरगावी गेले असता, घरफोडी करून घरातील सोन्या चांदीचे दागिने तसेच नगदी ३२ हजार व त्यांच्या शेतामधील मोटार पंप, सर्विस केबल, झडका मशीन असा एकूण १ लाख ३० हजार ५०० रूपयाचा माल चोरून नेल्याची तक्रार होती. प्रकरणात दाखल केलेला अटकपूर्व जमानत अर्ज अकोट सत्र न्यायालयाने नामंजूर केला आहे. आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून म्हणजे १६.११.२०२४ पासून फरार आहे. या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अजीला विरोध करतांना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला की, फिर्यादी यासीन बेग बाहेरगावी गेले होते. परत आल्यानंतर दिवानझरी येथील घराचे कुलून कडीकोंडा तुटलेला दिसला. घरातील अलमारी उघडी दिसली व त्यात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व एकूण १६ हजार रूपये नगदी रोख रक्कम ३२ हजार रूपये तसेच अलमारीतील कागदपत्रे चेकबुक, एटीएम कार्ड इत्यादी चोरी गेल्याचे दिसले. शेतात जावून पाहिले तर टिनशेडचे कुलूप तोडलेले दिसले व शेडमधील मोटारपंच, झटका मशीन, सव्हिस केबल हे चोरी गेल्याचे दिसले. फिर्यादीने चोरीबाबत चौकशी केली असता, नातेवाईकांनी फिर्यादीला सांगितले की, आरोपी सलमान खाँ अमीर खाँ. रा. इंदिरा नगर हिवरखेड हा बरेचदा फिर्यादीच्या घराजवळ व शेताजवळ चोरटया नजरेने टेहाळणी करीत होता. अशा फिर्यादीवरून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## पैशाच्या वादातून रमण चांडक यांचा खुन

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी)

चारचाकी ट्रक, टिप्पर त्याच बरोबर बोरगावमंजु येथे क्रशर व्यवसायिक अकोट येथील रमण चांडक यांचा जुना वादातून हत्या करण्यात आली आहे. त्याच्या पत्नीने मिसिंगची तक्रार केल्यानंतर पोलिसांना त्यांच्या मोबाइलचे लोकेशन मिळाल्यानंतर त्यांचा मृतदेह सापडला. या हत्या प्रकरणात एका संशयिताला अकोट पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, रमण चांडक यांच्या हत्येने अकोट हादरले असून पोलिस या घटनेचा तपास करत आहे.

या हत्येचे नेमके कारण काय असा प्रश्न अकोलेकरांना पडला आहे. अकोटमध्ये चारचाकी वाहनांचे ऑटो डीलर व्यापारी रमन चांडक यांची हत्या करण्यात आली, अकोट तालूक्यातील अकोट-पोपटखेड रस्त्यावर हत्या झाल्याची प्राथमिक प्राथमिक माहिती मिळाली आहे, ही ही हत्या व्यवसायातील मतभेद आणि आर्थिक वादातून झाल्याची चर्चा तालुक्यात सुरूआहे. अकोट ग्रामीण पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती असून ही हत्या अकोट पोपटखेड रस्त्यावरील पोपटखेड शेतशिवारात बंद पडलेल्या बोन कारखाना इमारतमध्ये झाल्याचे समजते.



पैशांच्या आर्थिक व्यवहारातून रमण चांडक यांच्या डोक्यात दगड घालून ठार केल्याचे समजते. या घटनेनंतर पोलिसांनी या प्रकारात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू पुढील तपास सुरू केला आहे. चांडक यांच्या हत्या प्रकरणात एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतला असल्याच बोलल्या जात आहे. चांडक हे अकोट तालुक्यातील पणज गावचे असून ते मागील काही वर्षापासून अकोल्यात राहत होते. पैशांच्या देवाण-घेवाणच्या



कारणावरून हत्या झाल्याचं बोलल्या जाते आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

अकोल्यात एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर २५ वर्षीय तरुणाने मध्यरात्रीच्या सुमारास अत्याचार केल्याची अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. ही घटना रात्री साधारण दोन वाजताच्या सुमारास घडली. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी तिच्या मैत्रिणीकडे अकोल्यात आली होती.

रात्री उशिरा ती आपल्या दुसऱ्या अल्पवयीन मैत्रिणीसोबत अकोला रेल्वे स्टेशन चौकात उभी होती. त्याचवेळी एक २५ वर्षीय अनोळखी तरुण दुचाकीवर तेथे आला आणि पीडित मुलीला सोबत घेऊन गेला.

संशयित तरुणाने तिला शहरातील अकोट फैल भागात नेऊन तिच्यावर अमानुष अत्याचार केला. अत्याचारानंतर त्याने पीडित मुलीला पुन्हा रेल्वे स्टेशन चौकात आणून सोडले.

## उष्माघात व उष्णतेच्या लाटेबाबत सुचना

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

प्रादेशिक हवामान विभाग नागपुर यांचे दिनांक ८ एप्रिल २०२५ चे प्राप्त संदेशानुसार दि. ८ एप्रिल ते दि. ९ एप्रिल २०२५ दरम्यान विदर्भातील जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत जिल्हा प्रशासनाव्दारे नागरिकांना सुचित करण्यात येत आहे.

काय करावे : तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सूती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री टोपी, बुट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी, रुमाल, दुपट्टा वापर करण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ आर.एस., घरी बनविण्यात आलेली लस्सी, कैरीपाणी, लिंबूपाणी, ताक इत्यांदीचा नियमित वापर करण्यात यावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. विविध शासकीय व खाजगी आस्थापनांनी कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. गरोदर महीला कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. उष्माघाताचे लक्षण दिसताच तात्काळ डॉक्टरांना संपर्क साधावा,

काय करु नये : लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमाण अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावे. उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नये, मद्य सेवन, चहा, कॉफ्फी आणि काबीनेटेड सॉफ्ट ड्रिंक घेवू नये, त्यामुळे डीहायड्रेशन होते. उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह जिल्ह्यात राबविण्यात येत असून त्यात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण डॉ. अनिता राठोड यांनी दिली. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन उपक्रम घेऊन सप्ताहाचा मंगळवारी आरंभ करण्यात आला. दि. ९ला विभागातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा घेण्यात येईल. दि. १० एप्रिल रोजी पथनाट्य व लघुनाटिकांद्वारे सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येईल. दि. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करणे व त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली जाईल.

दि. १२ एप्रिल रोजी भारतीय संविधानाबाबतची माहिती देणारी व्याख्याने आयोजन करण्यासोबतच नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर चर्चा केली जाईल.दि. १३ एप्रिल रोजी प्रत्येक जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबिर व मेळावा आयोजन, विभागातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहांत रक्तदान शिबिरांचे आयोजन तसेच दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, व्याख्याने व चर्चासत्रांचे आयोजन तसेच जिल्हास्तरावर कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान मेळावा आयोजित करून बाबासाहेबांनी शेतक-यांसाठी केलेल्या कार्याबाबत माहिती दिली जाईल, असे सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी कळविले आहे.

## घरकुलधारकांना लवकर निधी द्यावा!

■बार्शिटाकळी,दि ८ (प्रतिनिधी) :

तालुक्यातील कोथळी खुर्द गावातील घरकुल लाभधारकांनी अनेक दिवसांपासून बांधकाम पूर्ण केले. त्यांना त्वरित पैसे देण्यात यावे. अन्यथा आंदोलन करण्यात येईल, अशा प्रकारचा इशारा कोथळी खुर्दचे उपसरपंच तथा प्रहार जनशक्ती पक्षाचे उप तालुकाप्रमुख नारायण लोखंडे यांनी बार्शिटाकळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रविकांत पवार यांच्याकडे ७ एप्रिलला निवेदनाद्वारे दिला.निवेदनात म्हटले आहे की, गावातील व्यक्तींना शासनाकडून घरकुले मंजूर झाल्यानंतर त्यांनी सदर बांधकाम पूर्ण केले आहेत. घर बांधण्यासाठी खासगी सावकार तसेच कुटुंबातील सदस्यांचे दागिने गहान ठेवलेले आहेत.

अनेक दिवसांपासून सदर लाभधारकांनी घरकुल बांधून पूर्ण केले असून, या संदर्भात पंचायत समितीला माहितीही सादर केली. घरकुल लाभधारकांना तत्काळ पैसे देण्यात यावे अन्यथा पंचायत समितीसमोर प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने आंदोलन करण्यात येईल. अशा प्रकारचा इशारा संबंधित





निवेदनातून नारायण लोखंडे, तालुकाप्रमुख अक्षय वैराळे, संदीप चव्हाण, तुषार लोखंडे अशा अनेकांनी दिला आहे.

यासंदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रविकांत पवार यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## थोडक्यात

### भव्य शाम संकीर्तन उत्सवाचे आयोजन

**अकोला** :सामाजिक व सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या गोरक्षण रोड का राजा विघ्नहर्ता गणेश उत्सव मंडळाच्या वतीने महानगरात भव्य श्याम संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक १० एप्रिल रोजी सायं ६ वाजता मुर्तीजापुर रोड रस्त्यावरील सिटी स्पोर्ट क्लब येथे हा श्याम संकीर्तन उत्सव होणार असून यात कलकत्ता येथील प्रख्यात भजन गायक राज पारिख यांची उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या ओजस्वी वाणीतून संगीतमय भजने सादर करण्यात येणार आहेत.यात त्यांना भजन गायक उमेश डब्बू शर्मा,गोपाल शर्मा हारे व नेतल शर्मा यांनी साथसंगत लाभणार आहे.या उत्सवाची जोरदार तयारी मंडळाच्या वतीने करण्यात आली असून महानगरातील समस्त महिला पुरुष शाम भक्तांनी या संकीर्तन उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन गोरक्षण रोड का राजा विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळ, गोरक्षण रोड च्या समस्त पदाधिकारी व सेवाधाऱ्यांनी केले आहे.



### आईच्या प्रेरणेतून आयोजित भागवत कथा सप्ताहाची भक्तिमय सांगता

**अकोला :** कोठारी वाटिका पार्क नंबर तीन येथे आईच्या प्रेरणेतून आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताहाची महाआरती आणि महाप्रसादाने भक्तिमय वातावरणात सांगता झाली. जोशी परिवाराने या विशेष भागवत सप्ताहाचे आयोजन केले होते, ज्यामध्ये अनेक नामवंत कीर्तनकारांनी आपल्या वाणीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. या कथा सप्ताहाचे आयोजन पवन जोशी गुरुजी यांनी त्यांच्या मातोश्रींच्या प्रेरणेतून केले होते. गुढीपाडव्याच्या शुभदिनी ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यात शिवभक्त मंडळ आणि विविध भजनी मंडळांनी सहभाग घेतला. चैत्र द्वितीयेला गणपती पूजन आणि कलश पूजन पार पडले. परमपूज्य श्री नरेंद्रनाथ महाराज चौधरी यांच्या पावन स्पर्शाने कथा मंडप पवित्र झाला आणि त्यांच्या मार्गदर्शनाने भक्तांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. हभप शशिकांत पांडे महाराज यांची देखील या सप्ताहात उपस्थिती लाभली. हभप सुजित महाराज देशमुख यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून भाविकांना भागवत कथेतील अमृततत्वाचे रसपान करवले. सप्ताहातील कीर्तन सोहळ्यांमध्ये हभप गजानन महाराज गोडंचवर, हभप रितेश खोत महाराज, हभप राम कृष्ण महाराज अंबुस्कर, हभप निलेश महाराज इंगोले आणि प्रवचनकार अमोल चिंचाळे गुरुजी यांसारख्या अनेक दिग्गज होते.

## 'सहकारातून समृद्धी' योजनेतून सहकार चळवळ गतिमान होईल! : नानासाहेब हिंगणकर

### पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न



■अकोट,दि ८ (प्रतिनिधी) :

'सहकारातून समृद्धी' ही योजना देशातील सहकारी चळवळीला बळकटी देण्यासाठी आणि तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आहे. या योजनेअंतर्गत, सहकारी संस्थांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील असा विश्वास ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर यांनी अकोट येथील सहकार प्रशिक्षण कार्यशाळेत व्यक्त केला.

अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमाने अकोट कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभागृहात'आंतर राष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त' आयोजित पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था व इतर बिगर शेती संस्थेच्या पदाधिकारी व संचालकांचे कार्यशाळेचे उद्घाटन करतांना नानासाहेब हिंगणकर बोलत होते.अध्यक्षस्थानी बँकेच्या संचालिका श्रीमती भारतीताई गावंडे होत्या याप्रसंगी आकोट खविसचे अध्यक्ष जेष्ठ नेते हिदायत पटेल,बँकेचे नवनिर्वाचित संचालक डॉ जसराज कोरपे,सहा.निबंधक सहकारी संस्था श्रीमती रोहिणीताई विटणकर,कृउबास सभापती प्रशांत पाचडे, सहकारी जिनिंगचे अध्यक्ष सुभाष वानखेडे,खविसचे उपाध्यक्ष शेषराव पाटील ,कृउबास उपसभापती अतुल खोटरे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.या कार्यशाळेत बँकेचे निवृत्त सरव्यवस्थापक बी.जे काळे व चार्टर्ड अकाऊंटंट सुवर्णा मंगळे यांनी 'सहकारातून समृद्धी'योजनेचे उद्देश,विविध उपक्रम व कार्यपद्धती बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेला तालुक्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी,संचालक व सहकार कार्यकर्ते उपस्थित होते

**डॉ जसराज कोरपे यांचा सत्कार**

जिल्हा बँकेचे संचालक म्हणून नवनिर्वाचित झालेले युवा नेते डॉ जसराज संतोषकुमार कोरपे यांचा तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद ठाकरे यांनी तर प्रास्ताविक शाखाधिकारी आशिष घोम यांनी केले व आशिष ठाकरे यांनी आभार प्रदर्शन केले, नियोजनात्मक कार्यक्रम व्हावा याकरीता बँकेचे अधिकारी प्रशांत उकंडे, गजेंद्र शिंदे, उमेश मोरे व मंगेश काळे यांनी विशेष प्रयत्न केले..

## शकुंतला रेल्वेच्या लोकोशेड व स्टेशन परिसरात भीषण आग

### गोरगरिबांच्या आशेच्या धुरामध्ये उडाल्या आठवणी!





■मुर्तिजापुर,दि ८ (प्रतिनिधी) :

आज ७ फ्रेब्रुवारी, दुपारी एक वाजता, अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर रेल्वे जंक्शनवरील शकुंतला रेल्वे स्टेशन परिसरात आणि लोकोशेडमध्ये भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या ऐतिहासिक आणि गोरगरिबांची लेकुरवाळी समजल्या जाणाऱ्या शकुंतला रेल्वेने आज पुन्हा एकदा आगीत होरपळून दुर्दैवाच्या छायेखाली आपली हाक दिली.

आग एवढ्या वेगाने पसरली की काही क्षणांतच आकाशात काळ्या धुराचे लोट उसळले. परिसरात अफ्रवा पसरल्या, लोकांनी घरातून बाहेर धाव घेतली, भीतीने वातावरण भारावून गेले. जळणाऱ्या स्टेशन परिसराने आणि लोकोशेडने जणू काळच थांबवला होता!

अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं, पण उरुळलेल्या रस्त्यांमुळे आणि खड्ड्यांनी भरलेल्या मार्गांमुळे त्यांना घटनास्थळी पोहोचण्यात अडचणी आल्या. या विलंबामुळे आग आणखीनच भडकली आणि शतकभर जुना इतिहास, आठवणी, वारसा - सगळं काही या आगीत धुरात मिसळून गेलं.रेल्वेचे कर्मचारी जीवाची बाजी लावून आग आटोक्यात आणण्याचा आटोकाट प्रयत्न करत राहिले. त्यांच्या धाडसामुळे एक मोठा अनर्थ टळला, अन्यथा संपूर्ण स्टेशन राखरांगोळी होण्याची शक्यता होती.

हे पहिल्यांदाच घडलेलं नाही. २३ जानेवारी २०१९ रोजीही अशाच प्रकारे शकुंतला रेल्वेच्या बोगीला आग लागून ती पूर्णतः जळून खाक झाली होती.

मग प्रश्न उभा राहतो, इतक्या ऐतिहासिक रेल्वे स्थानकावर सुरक्षा उपाययोजना का नाहीत? अग्निशमन यंत्रणा वेळेत पोहोचू, एकीकडे सामान्य नागरिक शकुंतला रेल्वे पुन्हा रुळावर यावी म्हणून आंदोलने, निवेदने, निदर्शने करत आहेत, तर दुसरीकडे राजकीय नेत्यांचे दुर्लक्ष आणि प्रशासनाची उदासीनता ही ऐतिहासिक रुळं गिळायला निघाली आहे.

आजही मुर्तीजापुर, अचलपूर, कारंजा, दर्यापूर आणि यवतमाळसारख्या भागातील नागरिक शकुंतला रेल्वे सुरू होण्याची वाट पाहत आहेत, पण प्रत्येक वेळी त्यांच्या आशा धुरामध्ये विरतात.

शकुंतला ही फक्त एक रेल्वे नव्हे, ती एक भावना आहे - गोरगरिबांच्या प्रवासाची, इतिहासाची आणि आपल्या संस्कृतीची.पण आज त्या भावनेलाच आग लागली, आणि अजूनही कोणी जबाबदार नाही!

## कर्ता हनुमान मंडळाच्या कीर्तन महोत्सवात कास्तकार पाल्यांचा होणार आदर्श विवाह

## नियमामुळेच सर्वंकष प्रगती शक्य : हभप दादा महाराज कोळसकर

■अकोला,दि ८ (प्रतिनिधी):

सर्व जग ,सृष्टी ,निसर्ग हे एका चाकोरीबद्द नियमाने चाललेले आहेत.नियमाने चालल्यामुळेच सृष्टीचा डोलारा संतुलित राहून सातत्याने सृष्टीचा विकास होत आहे. नियमाने शिस्त व अनुशासन निर्माण होते. यामुळे विकास साधल्या जातो. अनेक संस्था, संस्थाने ही यशोशिखरावर जाण्याला कारण म्हणजे अशा संस्थांचा नियम कारणीभूत आहे. जीवनात नियम न पाळणाऱ्या व्यक्ती काळाच्या आड चालल्या जातात. तर नियम पाळणारे हे यशाच्या शिखरावर आरूढ होतात. संतांचे जीवनही हे नियमाने भरलेले असून यामुळेच संत विश्व हे जगाला तारण्याचे महान काम करूशकत असल्याचा हितोपदेश नांदुरा येथील किर्तनकार हभप दादा महाराज कोळसकर यांनी केला. कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात गुरुवर्य वासुदेव महाराज व श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या कीर्तन उत्सवात हभप दादा महाराज कोळसकर यांचे कीर्तन संपन्न झाले.या कीर्तनात त्यांनी एकनाथ महाराजांचा'उघडा रे मंत्र, उघडा रे मंत्र।शिव जपे स्तोत्र राम नाम।एका जनार्दनी न करी आळस।चौऱ्यांशी लेश नको भोगू'।या अभंगावर



आपले कीर्तन सादर केले. संत एकनाथ महाराजांच्या जीवन कार्याचा परामर्श घेतांना हभप दादा महाराज यांनी संत एकनाथ महाराजच्या साम,दाम, दंड, भेद ,नीती या सूत्रांची फोड केली. एकनाथ महाराजांनी आपल्या त्यागी जीवनात अशा साम- दाम-दंड-भेद नीतीचा कित्ता गिरविण्याचे प्रकार सांगितले. संत यांना अभिप्रेत असलेली ही नीती शब्दरूपात असते.वास्तविक संत हे कधी च शस्त्र उचलत नाहीत, किंबहुना शब्दरूपी शस्त्राच्या जोरावर ते लोककल्याण्याची भाषा वापरतात.नियमाने माणसे ही मोठी होतात.अगदी वारकरी संप्रदाय ही नियम पाळत असतो. म्हणून जीवनात चांगल्या सकारात्मक अशा नियमाची कास धरून जीवन कृतार्थ करा. जीवन चंचल आहे. क्षणाचा भरवसा नाही.

अर्धे जीवन झोपेत जाते, आणि अर्धे जीवन निंदा,नालस्ती,मत्सर आदी दुर्गुणात जाते. म्हणून कर्म हे चांगले व सत्य परिस्थितीतून करा. कर्म जर चांगले तर लोकोत्तरजन्म ही चांगला होतो.कर्माची फळे ही काही काळाने आपला प्रभाव व फरक दाखवितात.अगदी यमाच्या माथ्यावर पाय देण्याची शक्ती आपल्या अंगी निर्माण झाली पाहिजे.म्हणून प्रत्येकाला साधनेची गरज असून त्यायोगे यमाच्या माथ्यावर आपण पाय देऊ शकतो. धुव, प्रल्हाद सारख्या पासून तर संत पर्यंत अनेक संत महात्म्यांनी यमाच्या माथ्यावर पाय दिला अर्थात अशा संतांनी मृत्यूलाही आपलेसे केले असल्याचे या सत्रात हभप दादा महाराज कोळसकर यांनी सांगितले.

सत्र प्रारंभी सर्वप्रथम मंडळाच्या वतीने हभप दादा महाराज यांचे समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. कीर्तनात आज बुधवार दि ९ एप्रिल रोजी तामसी येथील हभप किशोर महाराज काळे यांचे कीर्तन होणार आहे,उत्सवात गुरूवार दि १० एप्रिल रोजी वारी भैरवगड येथील वाणीभुषण हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन होणार आहे.शुक्रवार दि ११ एप्रिल रोजी चांदुर रेल्वे येथील हभप संदीप महाराज तायवाडे यांचे कीर्तन होऊन शनिवार दि १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वा. हभप स्वामी वासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाचे समापन करण्यात येणार आहे.

# भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचे अधिवेशन

१९६१ मध्ये गुजरातमधील भावनगर येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन भरले होते. यानंतर, काँग्रेसने एकतर्फी आघाडी घेतली आणि केंद्र सरकारमध्ये आणि गुजरातसह अनेक राज्यांमध्ये बराच काळ टिकून राहिली. ६४ वर्षांनंतर, ८ एप्रिल पासून अहमदाबादमध्ये पुन्हा एकदा काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. 'गुजरात मॉडेल' मोडून काँग्रेस पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे. गुजरात अधिवेशनाद्वारे काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकेल का? काँग्रेसने ६४ वर्षांनंतर अधिवेशनासाठी गुजरातची निवड का केली आणि काँग्रेसला याचा कसा फायदा होईल?

-----------------

गुजरातमधील अहमदाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन ८ आणि ९ एप्रिल रोजी दोन दिवस चालेल. पहिल्या दिवशी, काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय स्मारकात झाली. देशभरातील अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सुमारे २६२ प्रतिनिधी यात सहभागी झालेत. त्याचे अध्यक्षपद मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे होते. सायंकाळी ५ वाजता साबरमती आश्रमात भजन आणि प्रार्थना सभा झाली.

९ एप्रिल २०२५ रोजी मुख्य अधिवेशन शेवटच्या दिवशी साबरमती रिव्हरफ्रंट येथे होणार आहे, ज्यामध्ये सर्व प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष, काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि काँग्रेस कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहतील. या अधिवेशनात राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्यासह सर्व मोठे नेते उपस्थित राहणार आहेत.

या वर्षी महात्मा गांधी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्याची १०० वी जयंती आहे. तसेच सरदार पटेल यांची १५० वी जयंती आहे. दोघेही गुजरातशी संबंधित आहेत. तसेच, काँग्रेसला भाजपकडून सरदार पटेलांचा वारसा परत घ्यायचा आहे. अशा परिस्थितीत, हे सत्र अधिक खास आहे. या कारणास्तव, साबरमती आश्रम आणि सरदार स्मारक सारखी ठिकाणे निवडण्यात आली आहेत.

हे अधिवेशन २०२७ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या रणनीतीचा पाया रचेल. गुजरातमध्ये संघटनेची ताकद वाढवण्याचा आणि भाजपला आव्हान देण्याचा एक मार्ग म्हणून पक्ष याकडे पाहत आहे. याशिवाय, या अधिवेशनाच्या माध्यमातून पक्षाला गुजरात आणि राष्ट्रीय पातळीवर आपले स्थान मजबूत करायचे आहे.

देशातील नवीन राजकीय संस्कृती गुजरातपासून सुरू होते हे काँग्रेस हायकमांडला माहिती आहे. म्हणून, जर काँग्रेसने गुजरात मॉडेल मोडले तर त्याचा परिणाम संपूर्ण देशावर होईल. काँग्रेस येथे एक नवीन मॉडेल तयार करून भाजपची मुळे कमकुवत करू इच्छिते. यामुळे कार्यकर्त्यांना संदेश जाईल की पक्ष गुजरातमध्ये सक्रिय आहे आणि हायकमांडला येथे रस आहे. तसेच, गुजरातमध्ये काँग्रेसला विनोद मानणाऱ्यांचे विचार बदलतील.

राजकीय तज्ज्ञ रशीद किडवई यांचे मत वेगळे आहे. ते म्हणतात, 'काँग्रेसला त्यांची जुनी परंपरा पुन्हा जिवंत करायची आहे. स्वातंत्र्यापासून, दरवर्षी काँग्रेसचे अधिवेशन नवीन राज्यात होत असे, परंतु आणीबाणी लागू झाल्यानंतर ही परंपरा खंडित झाली.

२००२ मध्ये सोनिया गांधी काँग्रेस अध्यक्ष झाल्यानंतर, अधिवेशन फक्त दिल्लीतच होऊ लागले. आता काँग्रेसला असा विचार आला आहे की नवीन राज्यात अधिवेशन घेतल्याने पक्षाची प्रतिमा बदलेल आणि त्यांना त्यांची ताकद कळेल. काँग्रेसने भाजपला त्यांच्या बालेकिल्ल्यातून म्हणजेच गुजरातमधून बाहेर काढण्याचा मार्ग सुरू केला आहे.

देशाच्या राजकारणात 'गुजरात मॉडेल' का महत्त्वाचे आहे? असा प्रश्न अनेकांना पडला आहे . त्यावर रशीद किडवई म्हणतात, 'मोदींनी गुजरातमध्ये एक मॉडेल तयार केले, ज्याचा वापर भाजप राजकीय शस्त्र म्हणून करते. गुजरात मॉडेलच्या बळावर नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पंतप्रधान झाले. देशाचे सध्याचे राजकारण गुजरात मॉडेलभोवती फिरते.

भाजपने गुजरात मॉडेलचा वापर ५ प्रकारे केला...

१. पंतप्रधान मोदींनी गुजरातला 'विकासाचे मॉडेल' म्हणून देशासमोर सादर केले. हे मॉडेल मोठ्या गुंतवणुकी, चांगली वाहतूक आणि मुबलक रोजगाराशी जोडलेले होते. याशिवाय 'व्हायब्रंट गुजरात' आणि 'मोदी है तो मुमकीन है' सारख्या मोहिमा चालवल्या गेल्या.

२. गुजरात मॉडेल मोदींच्या वैयक्तिक यशाशी जोडलेले होते. मोठ्या कॉर्पोरेट्सना आकर्षित करणारा नेता म्हणून त्यांना सादर केले जात होते. राज्याला पुढे नेऊ शकते. यामुळेच भाजपने २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये केंद्रात सरकार स्थापन केले.



३. भाजपने राष्ट्रीय पातळीवर गुजरात मॉडेलची रणनीती पुन्हा मांडली. २००४ मध्ये गुजरातमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र तयार करण्यात आले आणि २००९ मध्ये विशेष गुंतवणूक क्षेत्र तयार करण्यात आले. या माध्यमातून राज्यातील मोठ्या प्रकल्पांना चालना मिळाली. यानंतर, केंद्रातील मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' आणि 'इज ऑफ डुइंग बिझनेस' सारख्या मोहिमा सुरू केल्या, ज्यामध्ये गुजरात मॉडेलची झलक दिसून आली. भाजपने इतर राज्यांमध्ये आणि केंद्रात याचा फायदा घेतला.

४. भाजपने विरोधकांविरुद्ध, विशेषतः काँग्रेसविरुद्ध गुजरात मॉडेलचा वापर केला. याद्वारे भाजपने दाखवून दिले की काँग्रेसकडे असे कोणतेही ठोस मॉडेल नाही, तर भाजपकडे गुजरातसारखे 'यशस्वी' मॉडेल आहे.

५. गुजरातमधील विविध समुदायांचे लोक बऱ्याच काळापासून शांततेने एकत्र राहत आहेत. २००२ पासून, दंगली झाल्या नाहीत किंवा दंगल सदृश परिस्थिती निर्माण झाली नाही.

ज्याप्रमाणे भाजपने गुजरात मॉडेलने संपूर्ण देशाला भुरळ घातली, त्याचप्रमाणे काँग्रेसलाही तेच करावे लागेल. हे इतर कोणत्याही राज्यात घडू शकते, परंतु भाजपची मुळे गुजरातशी जोडलेली आहेत. या कारणास्तव, गुजरातमधूनच भाजप तोडता येईल.

गुजरातमध्ये भाजपच्या तुलनेत काँग्रेसची स्थिती विचारात घेतल्यास १८२ जागांच्या गुजरात विधानसभेत, १९८५ मध्ये काँग्रेसने विक्रमी १४९ जागा जिंकल्या होत्या. पण त्यानंतर काँग्रेसच्या जागा हळूहळू कमी होऊ लागल्या.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने १८२ पैकी १५६ जागा जिंकून सरकार स्थापन केले. त्याच वेळी, काँग्रेसच्या जागा १७ पर्यंत कमी झाल्या. त्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक लढवणाऱ्या 'आप'ने काँग्रेसची १३% मते कमी केली होती. निवडणुकीच्या एक वर्षानंतर, काँग्रेस आमदारांची पक्ष सोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. सध्या भाजपकडे १६१ जागा आहेत आणि काँग्रेसकडे १२ जागा आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुका काँग्रेस आणि आपने एकत्र लढल्या. असे असूनही, काँग्रेसला २६ पैकी फक्त एकच लोकसभा जागा जिंकता आली. तर भाजपचा मतांचा वाटा ६१.८६% आणि काँग्रेसचा मतांचा वाटा ३१.२४% होता. तथापि, काँग्रेसला २० विधानसभा जागांवर फायदा झाला, जो २०२२ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत सुधारणा दर्शवितो.

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला. भाजपने ६८ पैकी ६० नगरपालिका जिंकल्या, तर काँग्रेस १३ नगरपालिकांवरून एका नगरपालिकेवर आली.

याशिवाय, भाजपचे संघटन मजबूत आणि एकसंध आहे, तर काँग्रेस नेतृत्वाच्या अभावाने आणि पक्षांतराने झुंजत आहे. एकंदरीत, प्रत्येक निवडणुकीत भाजपचे वर्चस्व असते, तर काँग्रेस मागे पडते.

गुजरातमधील काँग्रेस नेतृत्वात दोन प्रकारचे लोक आहेत. त्यांच्यात एक प्रकारचा मतभेद आहे. काही लोक असे आहेत जे जनतेसोबत उभे राहतात आणि त्यांच्या हृदयात काँग्रेसची विचारसरणी आहे. दुसरे म्हणजे जे जनतेपासून तुटलेले आहेत, दूर बसलेले आहेत आणि त्यापैकी निम्मे भाजपशी संबंध ठेवणारे आहेत. जरी आपल्याला १०, १५, २०, ३० किंवा ४० लोकांना काढून टाकावे लागले तरी आपण ते एक उदाहरण घालून करू.

परंतु, गुजरात अधिवेशनाद्वारे काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकेल का? हा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, काँग्रेसला तळागाळात मोठे काम करावे लागेल. ते म्हणतात, 'गुजरातमध्ये काँग्रेसची मतपेढी मुस्लिम आणि आदिवासींची आहे.' विकासाच्या नावाखाली भाजपला मतदान करणाऱ्या गुजरातींनाही काँग्रेसला शांत करावे लागेल. गुजरातला मॉडेल म्हणून ओळखले जात असले तरी, प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. गुजरातमधील छोट्या मुद्द्यांवरूनच काँग्रेसला मोठा विजय मिळू शकतो.

काँग्रेसने नवीन पिढीमध्ये म्हणजेच तरुण आणि महिलांमध्ये प्रवेश केला तर त्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. ते म्हणतात, 'गुजरातमधील एका संपूर्ण पिढीला काँग्रेसचे नेतृत्व कसे होते हे माहित नाही. खरं तर, गेल्या ३० वर्षांपासून गुजरातमध्ये भाजप सत्तेत आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसला नवीन पिढीपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. तसेच, काँग्रेसला मोठ्या संख्येने महिलांची भर घालावी लागेल. गुजरातमधील लोकांना भाजपचा पर्याय हवा आहे, परंतु काँग्रेस अपेक्षा पूर्ण करू शकत नाही.

दुसरा मतप्रवाह असा की, काँग्रेस मोदी मॉडेल मोडू शकते, पण ते सोपे काम नसेल. गुजरातमध्ये काँग्रेस बॅकफूटवर असल्याचे दिसून येते. यामुळे, काँग्रेसमध्ये अजूनही सुधारणेला वाव आहे. यासाठी काँग्रेसच्या प्रत्येक लहान-मोठ्या नेत्याला आणि कार्यकर्त्यांला कठोर परिश्रम करावे लागतील. गुजरातमध्ये २ वर्षांनी निवडणुका आहेत. अशा परिस्थितीत काँग्रेसकडे वेळ आहे. जर पक्षाने याचा फायदा घेतला तर काहीतरी साध्य होऊ शकते.

राहुल गांधींना गुजरातमध्ये काँग्रेस मजबूत हवी आहे. पण यासाठी त्यांच्याकडे मजबूत सैन्य आणि एक मजबूत सेनापती दोन्ही असले पाहिजेत. दुर्दैवाने गुजरात काँग्रेसकडे दोन्ही नाहीत. गुजरात काँग्रेसला अशा नेत्याची गरज आहे जो लढाऊ असेल. दुसरे वास्तव असे आहे की काँग्रेसकडे संघटना चालवण्यासाठी पैसे नाहीत.

भाजपप्रमाणेच काँग्रेसलाही आपले संघटन मजबूत करावे लागेल, असे रशीद किडवाई यांचे मत आहे. ते म्हणतात, 'भाजपची ताकद त्यांच्या संघटनेत आहे. त्यांच्या संस्थेला निवडणूक यंत्र म्हणतात. काँग्रेसलाही आपले संघटन मजबूत करावे लागेल. स्थानिक पातळीवर कार्यकर्ते निर्माण करून आपल्याला निवडणुका लढवाव्या लागतील.

देशासाठी त्याच्या विचारसरणीसह एक नवीन धोरण सादर करावे लागेल. गुजरातमध्ये काँग्रेसला एका मजबूत नेतृत्वाची गरज आहे, जे भाजपला आव्हान देऊ शकेल. याशिवाय, पक्षाला पाठिंबा देऊ शकतील अशा विश्वासू नेत्यांची आणि कार्यकर्त्यांचीही पक्षाला गरज आहे. तथापि, राहुल यांना याची आधीच जाणीव आहे.

काँग्रेस केवळ अधिवेशन घेऊन मोदी मॉडेल मोडू शकत नाही. ते म्हणतात, 'जेव्हा जेव्हा एखादा पक्ष बैठक किंवा अधिवेशन आयोजित करतो तेव्हा तो जनतेसमोर एक नवीन उदाहरण मांडण्याची एक चांगली संधी असते. एक नवीन आणि मजबूत रणनीती तयार करा आणि त्यावर काम करा. काँग्रेस आणि भाजपमधील फरक असा आहे की भाजप केवळ रणनीती बनवते आणि ती सार्वजनिक करतेच असे नाही तर जमिनीवर त्यावर काम देखील करते. तर काँग्रेसच्या बाबतीत असे नाही. कुठेतरी, काँग्रेसला भाजपच्या मार्गावर चालत भाजपला तोडावेच लागेल.

तथापि, या अधिवेशनाच्या माध्यमातून काँग्रेस आपल्या कार्यकर्त्यांना सक्रिय राहून भाजपचा धैर्याने सामना करण्याचा संदेश देऊ शकते. बघुया, या अधिवेशनाने काँग्रेस काय साध्य करते?

■ ■ ■

# संगीत रंगभूमीचे वैभव : अशोक परांजपे

मूळ सांगली जिल्ह्यातील हरीपूरचे असलेले अशोकजी परांजपे यांनी केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर, अवघे गरजे पंढरपूर, कैवल्याच्या चांदण्याला, नाविका रे वारा वाहे रे, ही आणि इतरही अनेक प्रसिद्ध मराठी गाणी लिहिली.

अशोक गणेश परांजपे हे पट्टीचे मराठी गीतकार होते. ते मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोककला संचालनालयाचे संचालक होते. त्यानंतर ते औरंगाबादला स्थायिक झाले होते. त्यांनी भक्तिगीत, भावगीत, अंगाईगीत, लावणी, गण-गवळण आणि नाट्यगीत या प्रकारची गीते लिहिली. इंडियन नॅशनल थिएटर- आयएनटी रिसर्च सेंटरचे त्यांचे काम सुरू असताना त्यांनी महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील लोक कलावंतांच्या लोककलेच्या ध्वनिफिती तयार केल्या. परांजपेंनी १९९२मध्ये पंढरपूर भक्तिसंगीत महोत्सव आणि १९८६मध्ये आनंदवन येथील महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव, असे दोन महोत्सव आयोजित केले. या कामाची नोंद फोर्ड फाउंडेशनने घेतली.

ऑस्ट्रियातील इन्स्टिट्यूट ऑफ व्हिडिओग्राफी-आयओव्ही या आंतरराष्ट्रीय लोककला संस्थेने त्यांना सभासदत्व दिले. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी कलावंतांना फ्रान्स, आयर्लंड, जपान आदी देशांत नेऊन तेथे त्यांना कला सादर करण्याची संधी मिळवून दिली. अशोक गणेश परांजपे हे महाराष्ट्रातील लोककला संशोधक, गीतकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म ३० मार्च १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे झाला. त्यांचे वडील गणेश परांजपे हे आयुर्वेदाचार्य होते. हरिपूर ही भूमी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या नावाने ओळखली जाते.

शालेय जीवनापासूनच त्यांना सांगली परिसरातील लोककलांचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. शाहीर आनंदराव सूर्यवंशी, शाहीर बापूराव विभूते, तमाशा कलावंत शंकर तात्या सावजळकर, काळू-बाळू अशा लोककलावंतांशी त्यांचा संपर्क होता. शाहिरी, सोंगी भारुड दत्तपंथी भजन, तमाशा, तलवार, दांडपट्टा, करपल्लवी या लोककला सांगली परिसरात लोकप्रिय होत्या. त्या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखन, वाचन, चित्रकारी सोबतच कुस्तीची त्यांना आवड होती. मुंबईत आल्यावर जे.जे.स्कुल ऑफ आर्टमध्ये त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले.

१० ऑक्टोबर १९७८ रोजी इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्राची स्थापना वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या हस्ते झाली. या संशोधन केंद्राचे संचालक म्हणून अशोकजींनी जबाबदारी स्वीकारली. १९८६ साली इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्रातर्फे आनंदवन वरोरा येथे आदिवासी महोत्सवाचे आयोजन त्यांच्या संकल्पनेतून झाले होते. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी या आदिवासी महोत्सवाचे मार्गदर्शक होते.

१९९२ मध्ये पंढरपूर येथे भक्तीसंगीत महोत्सवाचे आयोजन त्यांच्याच संयोजनाने झाले होते. फ्रान्स, आयलंड, जपान आदी देशांत महाराष्ट्रातील लोककलांची पथके नेवून तेथे मार्गदर्शन केले. खंडोबाचे जागरण, देवीचा गोंधळ, कोकणातील दशावतार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या कला, पारंपरिक तमाशा, कीर्तन, लळीत अशा लोककलांच्या जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयएनटीच्या लोक प्रायोज्य कलेच्या संशोधन विभागाचे संचालक असताना कार्य केले.

तमाशा अभ्यासक रुस्तुम अचलखांब, शाहीर बापूराव विभूते, गोंधळमहर्षी राजारामबापू कदम, चित्रकथी बाहुलेकार गणपत मसगे, परशुराम गंगावणे, पारंपरिक वाद्ये शंकरराव जाधव धामणीकर, दशावतारी कलावंत बाबी नालंग अशा अनेक लोककलावंतांचे कार्यक्रम त्यांनी मुंबईत छबिलदास सभागृहात आयोजित केले. खंडोबाचे जागरण, लळीत, दशावतार, वासुदेवांची गाणी, नमन खेळे, मादळ यांसारख्या आदिवासी कला यावर अभ्यासपूर्ण पुस्तिका त्यांच्या संकल्पनेतून आयएनटीने प्रसिद्ध केल्या. खंडोबाचं लगीन, दशावतारी राजा, जांभूळाख्यान, वासुदेव सांगती, अरे रे संसार, मातीचं स्वप्न अशा आयएनटी संशोधन केंद्राच्या संशोधन नाट्यांची मूळ संकल्पना आणि लेखन मार्गदर्शन परांजपे यांचे होते.

महाराष्ट्रात लोककलांच्या संशोधनाची नवी परंपरा निर्माण करून तरुण अभ्यासकांची फळी महाराष्ट्रभर उभी करण्याचे श्रेय त्यांना जाते. प्रकाश खांडगे, तुलसी बेहेरे, रमेश कुबल, गणेश हाके, सुरेश चव्हाण, पंढरीनाथ काळे, सुरेश चिखले, रामचंद्र वरक अशा तरुण अभ्यासकांची फळी त्यांनी निर्माण केली. त्यांना त्यांचा अभ्यास विषय असलेल्या लोककलांमध्ये मार्गदर्शन केले.

अशोक परांजपे यांचे मराठी रंगभूमीवरील योगदान नाटककार म्हणून उल्लेखनीय आहे. संत कान्होपात्रा, संत गोरा कुंभार, अबक दुबक, बुद्ध इथे हरला आहे, आतून कीर्तन वरून तमाशा, दार उघड बया सारखी संगीत रंगभूमीचे वैभव वाढविणारी नाटके त्यांनी लिहिली. नाटकांसोबतच वर्तमानपत्रात त्यांनी स्तंभ लेखन केले. अनोळखी पाऊले ही त्यांची स्तंभलेखन मालिका अतिशय प्रसिद्ध होती. लोककलांचे संशोधन, नाट्यलेखन या सोबतच ते गीतकार म्हणूनही लोकप्रिय होते.

अवघे गर्जे पंढरपूर, आला आला सुगंध मातीचा, एकदाच यावे सखया, कुणी निंदावे वा वंदावे, केतकीच्या बनी तिथे, दारी उभी अशी मी, दीनांचा कैवारी, नाम आहे आदी अंती, नाविका रे, पाखरा जा दूर देशी, पैलतीरी रानामाजी, वाट इथे स्वप्नातील संपली जणू, आला आला सुगंध मातीचा अशी अनेक लोकप्रिय गीते त्यांनी लिहिली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. लोककला संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. अशोकजी परांजपेंनी ९ एप्रिल २००९ रोजी त्यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या अविस्मरणीय अनेक स्मृतींना विनम्र अभिवादन !!

--------------

: संकलन व शब्दांकन :
**एन. कृष्णकुमार, से. नि. अध्यापक**
**गडचिरोली.**
**७७७५०४१०८६.**

■ ■ ■

# धर्मदाय रूग्णालयावर असावी सरकारची करडी नजर

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशाअभावी उपचार नाकारल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी धर्मदाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरून पुण्यात रूग्णालयाच्या बाहेर विविध संघटनांकडुन आंदोलन करण्यात आले होते. १० लाख रुपये जमा न केल्यामुळे महिलेला रूग्णालयात भर्ती करण्यास रूग्णालय प्रशासनाने मनाई केली. यानंतर त्या महिलेने दोन जुळव्या मुलांना जन्म दिला व तिचा यात मृत्यू झाला.

यानंतर आता रूग्णालयाकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून यानंतर रूग्णांकडून डिपॉझिट घेतले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक प्रकारचे उपचार रूग्णांवर होतात. त्यामुळे सर्व चूक रूग्णालयाची आहे असे म्हणून चालणार नाही. परंतु या केसमध्ये नक्कीच असंवेदनशीलपणा दाखविण्यात आला आहे ही बाब तेथील झालेल्या घटनेवरून स्पष्ट दिसून येते. कारण गर्भवती महिलेचा मृत्यू अंगावर शहारे येणारा आहे. त्यामुळेच तेथील नागरिक किंवा आप्त आक्रमक झालेत.

कोणतेही रूग्णालयात असो रूग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या वेदना घेऊन येत असतो.कारण कोणत्याही रूग्णांची आपात्कालीन प्रकृती खराब झाली तर आपल्या परिस्थितीनुसार खाजगी किंवा सरकारी किंवा धर्मदाय रूग्णालयाकडे धाव घेऊन रूग्णांवर आपात्कालीन परिस्थितीत ताबडतोब उपचार व्हावेत अशी इच्छा संपूर्ण रूग्णांच्या नातेवाइकांची असते.अशा परिस्थितीत रूग्णांचे परिवार आपल्या ऐपतीप्रमाणे पैसा गोळा करून त्या-त्या रूग्णालयात उपचार घेतात.

परंतु आपण जेव्हा धर्मदाय रूग्णालयाची परिभाषा करतो तेव्हा आपात्कालीन परिस्थितीत कोणताही रूग्ण असो त्यावर रूग्णालय प्रशासनाने ताबडतोब उपचार करायला हवेत.कारण हा जिवन मरणाचा प्रश्न असतो.कारण यात थोडीशी चूक किंवा वेळ झाला तर तो रूग्ण दगावतो आणि हाच प्रकार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झाला.

आपण डॉक्टरांना दैवी शक्ती असल्याचे मानतो त्याचपध्दतीने रूग्णालय प्रशासनाने तत्परता दाखविने गरजेचे असते. रूग्णालयाला सुध्दा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो यात दुमत नाही.कारण स्टाफ कमी असने अशाप्रकारे अनेक अडचणी त्यांच्या समोर सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अशा घटनांमुळे राज्यात एक वेगळाच संदेश जातो. कारण राज्यात तब्बल ४७६ धर्मदाय रूग्णालये (ट्रस्ट हॉस्पिटल) आहेत. त्यामुळे आता आरोग्य विभाग व सरकारची जबाबदारी आहे की या संपूर्ण रूग्णालयाची काय अवस्था आहे किंवा रूग्णालय प्रशासनाच्या काय-अडचणी आहेत किंवा या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार होतो की नाही किंवा हयगय तर होत नाही ना ? या संपूर्ण गोष्टींवर आता सरकारने करडी नजर ठेवण्याची गरज आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांना आश्वस्त केले की भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी एक निश्चित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे काम सुरू आहे. याचे मी मनापासून स्वागत करतो .कारण पुढे अशा घटना होणार नाही याची ताबडतोब दखल मुख्यमंत्री महोदयांनी घेतली.

पुण्यातील घटना पहाता राज्यातील संपूर्ण सरकारी रूग्णालयाने, निमसरकारी रूग्णालयाने, धर्मदाय रूग्णालयेसह खाजगी रुग्णालयांनी आपात्कालीन परिस्थितीत रूग्णांना सवोतोपरी मदत केली पाहिजे.कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालये मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करतात यावर सुध्दा सरकारने अंकुश लावने गरजेचे आहे.कारण शेवटी माणूस हा माणूस असतो त्यामुळे धर्मदाय रूग्णालयांसोबतच खाजगी रुग्णालयांनी सुध्दा माणुसकी या नात्याने गरीब-निर्धन व सर्वसामान्यांना सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले तर ही खरी मानव सेवा समजली जाईल.

कारण महागाईच्या काळात गरीब व सर्वसामान्यांना सर्वच बाबतीत मोठी कडवी झुंज द्यावी लागते या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून संपूर्ण रूग्णालयांनी माफक दरात उपचार करण्यास स्वतःहुन तत्परता दाखवली तर अनेकांना जिवदान मिळेल व डॉक्टरांची दैवी शक्ती दिसून येईल.

# किवी खाण्याची योग्य पद्धत

उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारात निरोगी पदार्थांचे सेवन करणे महत्त्वाचे असते. शरीराला योग्य आणि निरोगी ठेवण्यासाठी आहारामध्ये फायबर्स, प्रोटिन्स आणि व्हिटॅमिन्सचा समावेश करणे गरजेचे असते. निरोगी आरोग्यासाठी, किवी हे एक सुपरफूड मानले जाते, ज्यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर असतात. पण जेव्हा ते खाण्याचा विचार येतो तेव्हा अनेकदा प्रश्न पडतो की, किवी सोलून खावे की न सोलून?

आरोग्यासाठी, किवी हे एक सुपरफूड मानले जाते. बरेच लोक किवी सोलून खातात, तर बरेच जण ते न सोलता खातात.



**किवी सोलून खाण्याचे फायदे..**

किवी सोलन खाल्ल्यामुळे ते अधिक मऊ आणि चविष्ट लागते. ज्यांना सालीचा पोत आवडत नाही त्यांच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे. ज्या लोकांना ॲलर्जी आहे किंवा संवेदनशील त्वचा आहे त्यांना फायदा होऊ शकतो, कारण काही लोकांना सालीमुळे हलकी खाज येऊ शकते.

**किवी सोलून खाण्याचे तोटे**

किवीची साल सोलून खाल्ल्यामुळे त्यामधील फायबर आणि पोषक तत्वांचे नुकसान होते, कारण सालीमध्येच बहुतेक फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. किवी साल काढून टाकल्याने व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक तत्वांचे प्रमाण कमी होते. किवीचे सेवन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असते.

**किवी न सोलता खाल्ल्यास काय होते?**

किवी न सोलता खाल्ल्यामुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतेच्या समस्यांमध्ये फायदेशीर आहे. किवीच्या सालीमध्ये सालीमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेसाठी फायदेशीर असतात.

किवीची साल रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते.

काही लोकांना किवीच्या सालीचा खडबडीत पोत आवडत नाही. जर किवी व्यवस्थित स्वच्छ केली नाही तर त्यात धूळ किंवा कीटकनाशके असू शकतात. त्वचेची संवेदनशीलता असलेल्या लोकांना सौम्य खाज येऊ शकते.

जर तुम्हाला किवीची साल खायची असेल तर या गोष्टी लक्षात ठेवाः घाण आणि रसायने काढून टाकण्यासाठी किवी पूर्णपणे धुवा. साल थोडीशी ब्रश करून किंवा हलक्या हाताने घासून स्वच्छ करा, जेणेकरून त्याचा खडबडीतपणा कमी होईल. तुम्ही किवी स्मूदी किंवा ज्यूसमध्ये मिसळून सहज सेवन करता येते. किवीचे लहान तुकडे करून खा, यामुळे खाताना साल कमी जाणवेल.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## क्या सीन है!

उष्णतेच्या लाटेनं
माणसं झालीत फ्राय
वरून महागाईचा तडका
करतोय त्यांना ड्राय ...

एवढयात समाधान नाही
म्हणून गॅसही महागला
' आम आदमी ' चा जीव
आता भलताच कावला..!

राजकीय पक्षांची सुरु
एकमेकांवर कुरघोडी
गरीबांच्या समस्येत
नाही कुणा भौ गोडी... !

# स्कोडा ऑटो आतापर्यंतच्या सर्वोच्च मासिक विक्रीसह भारतात साजरे करत आहे रौप्यमहोत्सवी वर्ष



**मुंबई, ८एप्रिल :** स्कोडा ऑटो इंडियाचे रौप्य महोत्सवी वर्ष भारतातील न्यू एराला देखील साजरे करते, जेथे या उल्लेखनीय टप्प्यामध्ये भारतातील त्यांच्या २५ वर्षांच्या इतिहासात सर्वोच्च मासिक विक्रीची नोंद झाली आहे. मार्च २०२५ मध्ये स्कोडा ऑटो इंडियाने ७,४२२ युनिट्सची विक्री केली, जी भारतातील ब्रँडद्वारे आतापर्यंतची सर्वोच्च मासिक विक्री आहे. नवीन कायलॅक एसयूव्ही लाँच करण्यासह रणवीर सिंग कंपनीचे पहिले ब्रँड ॲम्बेसेडर बनल्यानंतर हे यश संपादित करण्यात आले आहे, जेथे जागरूकता आणि विचारसरणीला चालना मिळत आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा या उल्लेखनीय विक्रीबाबत मत व्यक्त करत म्हणाले, ''नवीन कायलॅकच्या लाँचसह आम्ही भारतातील आमच्या प्रवासामध्ये 'न्यू एरा'प्रती कटिबद्ध आहोत. मार्च २०२५ मध्ये आम्ही विक्री केलेल्या ७,४२२ कार्समधून या प्रवासाला मिळत असलेला आकार दिसून येतो, तसेच शाश्वत नियोजन, प्रयत्न आणि धोरणामुळे हा टप्पा गाठण्यात आला आहे, ज्यांचा भारतातील रस्त्यांवर युरोपियन तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याचा मनसुबा आहे. ग्राहक अभिप्रायामधून निदर्शनास येते की कायलॅक अपवादात्मक किंमत-मूल्य तत्त्वासह येते, सेगमेंटमधील आरामदायीपणा, स्पेस व सुरक्षिततेला सब-४-मीटर एसयूव्ही सेगमेंटमध्ये घेऊन जाते. अधिकाधिक ग्राहकांना सक्षम करण्यासाठी आणि कायलॅकच्या यशाला साजरे करण्यासाठी आम्ही सुरूवातीची किंमत एप्रिल अखेरपर्यंत विस्तारित करण्याचे ठरवले.''

**कायलॅक: उच्च प्रगतीला चालना देत आहे**

भारतातील स्कोडा ऑटोसाठी आतापर्यंतच्या सर्वाधिक मासिक विक्रीची प्रमुख स्रोत आहे नवीन कायलॅक, जिची फेब्रुवारी २०२४ मध्ये घोषणा करण्यात आली होती. भारतीयांनी या कारचे नामकरण केले होते आणि नोव्हेंबर २०२४ मध्ये लाँच होण्यासह जानेवारी २०२५ मध्ये डिलिव्हरीजना सुरूवात झाली. ही स्कोडा ऑटो इंडियाची पहिली सब-४-मीटर एसयूव्ही आहे आणि फाइव्ह-स्टार सेफ रेटेड कार्सच्या स्कोडा परिवारामध्ये प्रवेश केला आहे. तिन्ही स्कोडा कार्स एमक्यूबी-एओ-एइन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आल्या आहेत. कुशक, स्लाव्हिया आणि कायलॅकने प्रौढ व्यक्ती व मुलांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण फाइव्ह स्टार मिळवले आहेत. कुशक आणि स्लाव्हियाची ग्लोबल एनसीएपीद्वारे चाचणी करण्यात आली, तर नुकतेच भारत एनसीएपी अंतर्गत कायलॅकची चाचणी करण्यात आली.

वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी कायलॅक निर्माणामध्ये झपाट्याने रॅम्प-अप करत आहे, जेथे बुकिंग्ज केलेल्या, तसेच बुकिंग्ज करणाऱ्या सर्व ग्राहकांना (१५,००० हून अधिक) मे अखेरपर्यंत डिलिव्हरी करण्याचा मनसुबा आहे.

**ग्राहकांसाठी अधिक सोयीसुविधा**

ब्रँडने २०२१ मधील १२० वरून आतापर्यंत २८० पर्यंत आपल्या टचपॉइण्ट्सचे नेटवर्क देखील विस्तारित केले, जेथे यंदा ही आकडेवारी ३५० पर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. स्कोडा ऑटो इंडियाने इनोव्हेशन्स देखील सादर केले, जसे फुली डिजिटलाइज्ड शोरूम्स, ऑनलाइन-ओन्ली सेल्स, ॲड-ऑन एनीटाइम वॉरंटी, सर्विस पारदर्शकता जसे स्कोडा सर्विस कॅम, स्पर्धात्मक मेन्टेनन्स खर्च आणि सर्विस किमतीमधील वाढीसंदर्भात संरक्षणासह स्कोडा सुपरकेअर. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने नुकतेच सर्व नवीन स्कोडा ग्राहकांसाठी एक-वर्ष कॉम्प्लीमेण्टरी सुपरकेअर मेन्टेनन्स पॅकेज सादर केले, ज्यामुळे ग्राहक व चाहत्यांसाठी सर्विस व मेन्टेनन्स खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

# सॅमसंगकडून होम अप्लायन्सेससाठी स्पेशल विस्तारित वॉरंटी सादर

**नागपूर, ८ एप्रिल :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आपले निवडक रेफ्रिजरेटर्स आणि फ्रण्ट लोड वॉशिंग मशिन्ससह सॅमसंग केअर+ वर भारतभर विशेष विस्तारित वॉरंटी मोहिम लाँच केली आहे.

ही ऑफर ३० एप्रिल २०२५ पर्यंत वैध आहे, ज्यामुळे ग्राहकांना उच्च आकर्षक व किफायतशीर दरामध्ये त्यांच्या अप्लायन्सेससाठी सुधारित संरक्षण सुनिश्चित करता येईल. अप्लायन्स खरेदी निर्णयांना गती देण्यामध्ये टिकाऊपणा महत्त्वपूर्ण घटक असण्यासह हा उपक्रम ग्राहकांना सॅमसंगच्या विश्वसनीय विक्री-पश्चात्त सेवांच्या माध्यमातून अतिरिक्त सोयीसुविधा आणि दीर्घकालीन अशुरन्स देतो.

या स्पेशल ऑफरअंतर्गत, ग्राहक निवडक फ्रण्ट लोड वॉशिंग मशिन्सवर फक्त ४९९ रूपयांच्या विशेष किमतीमध्ये ४,२९० रूपयांच्या सॅमसंग केअर+ सह २-वर्ष विस्तारित व सर्वसमावेशक वॉरंटीचा लाभ घेऊ शकतात. तसेच, रेफ्रिजरेटर्ससाठी सॅमसंग फ्रेंच डोअर व साइड-बाय-साइड (एसबीएस) मॉडेल्सवर ४४९० रूपयांच्या वॉरंटीसाठी ४४९ रूपयांच्या आणि ५०० लिटरखालील फ्रॉस्ट फ्री मॉडेल्सवर १२७० रूपयांच्या वॉरंटीसाठी ३४९ रूपयांच्या विशेष किमतींमध्ये १-वर्ष विस्तारित वॉरंटी देत आहे.

ग्राहक सॅमसंगचे रिटेल स्टोअर्स, Samsung.com आणि देशभरातील इतर रिटेल आऊटलेट्समध्ये या मर्यादित कालावधीच्या ऑफरचा लाभ घेऊ शकतात. सॅमसंग प्रबळ विक्री-पश्चात्त सेवेच्या पाठबळासह उच्च दर्जाची उत्पादने देत ग्राहक समाधानाला प्राधान्य देत आहे, तसेच नाविन्यता आणि विश्वसनीयतेच्या माध्यमातून व्यक्तींचे जीवन संपन्न करण्याचे आपले ध्येय अधिक दृढ करत आहे.

# दरोगा हप्पू सिंग अडकला दुहेरी संकटात!



**मुंबई, ८ एप्रिल :** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय घरेलू कॉमेडी 'हप्पू की उलटन पलटन' दरोगा हप्पू सिंगच्या (योगेश त्रिपाठी) विनोदी खोडकरपणासह प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. दरोगा हप्पू सिंगला पती, मुलगा आणि नऊ खोडकर मुलांचे वडिल म्हणून स्वत:च्या जीवनात संतुलन राखताना संघर्ष करावा लागत आहे. त्याची प्रबळ इच्छाशक्ती असलेली पत्नी राजेश (गीतांजली मिश्रा) आणि शिस्तबद्ध आई कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) यांच्यादरम्यान अडकलेल्या हप्पूचे जीवन आधीच गोंधळलेले आहे. पण त्याची सासू अवधेशियाच्या आगामनासह स्थिती अधिक नियंत्रणाबाहेर जाणार आहे. उर्मिला शर्मा अवधेसियाच्या भूमिकेत दिसणार आहेत. मालिकेमधील आपल्या प्रवेशाबाबत सांगताना उर्मिला शर्मा ऊर्फ अवधेसिया म्हणाल्या, ''हप्पूला स्वप्न पडते की, त्याची सासू अचानक त्याच्या घरी आली आहे. तो या स्वप्नाबाबत कटोरी अम्मा आणि राजेशला सांगतो, तेव्हा त्या दोघींच्या प्रतिक्रिया एकमेकींच्या विरूद्ध असतात. अवधेसिया आवडत नसल्याने कटोरी अम्मा चिडचिड करते, तर राजेशला खूप आनंद होतो, कारण तिचा विश्वास असतो की पहाटे पडलेली स्वप्ने खरी होतात. कटोरी अम्मा त्या स्वप्नाची थट्टा करू लागते, हप्पू नकळतपणे तिला पाठिंबा देतो, ज्यामुळे राजेश नाराज होते. पण त्यांच्या भावना बदलून जातात, जेथे माझी व्यक्तिरेखा त्यांच्या घरामध्ये प्रवेश करते आणि सर्वांना धक्का बसतो. माझ्या आगमनाने हप्पूच्या संकटात भर पडते. कटोरी अम्मा व अवधेसिया सतत भांडतात, ज्यामुळे हप्पूचे जीवन अधिक असह्य होऊन जाते.''

अभिनेत्री पुढे म्हणाल्या, ''राजेशला उत्साहित करण्यासाठी हप्पू त्याचा जिवलग मित्र बेनीच्या (विश्वनाथ चॅटर्जी) मदतीने तिच्यासाठी गाणे गात रोमँटिक गेस्चरची योजना आखतो. बेनी गातो, तर हप्पू त्याच्याशी अचूक लिप-सिंक करतो, जे पाहून राजेश खूप प्रभावित होते. ती कमिशनरसमोर (किशोर भानुशाली) त्याच्याबाबत बढाई मारते, ज्यामुळे कमिशनर हप्पूला बढती देण्याच्या बदल्यात त्याच्या जुन्या मैत्रिणीचे लक्ष वेधून घेण्यासाठी हप्पूच्या 'गायन कौशल्यांचा' वापर करण्याचे ठरवतो. हप्पूला सर्वकाही नियंत्रणात असल्यासारखे वाटत असतानाच संकट ओढवते. अवधेसियाने दिलेले औषधी उपचार केल्यानंतर बेनीचा आवाज जातो. ती ते दुरुस्त करण्याचा प्रयत्न करते, ज्यानंतर बेनीचा आवाज पुन्हा येतो. पण यावेळी त्याचा आवाज ओरडणाऱ्या गाढवासारखा असतो (हसतात). खरी धमाल आता सुरू होते. घरामध्ये अवधेसिया असल्यामुळे दररोज नवीन ड्रामा व अविरत हास्याचा आनंद मिळेल.''

# डिझाईनर फिनिशच्या नवीन रेंजसह बिर्ला ओपस पेंट्सने अभिजात सौंदर्याची नव्याने व्याख्या केली



**मुंबई, ८ एप्रिल :** आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम इंडस्ट्रीजचा एक भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने दोन विशिष्ट आणि भविष्यकाळास अनुरूप कलेक्शन्ससह डिझाईनर फिनिशची एक नवीन आणि नावीन्यपूर्ण श्रेणी लॉन्च केली आहे, जी भारतातील प्रीमियम इंटीरियर डिझाईनिंगचा कायापालट करेल. लक्झरीची नवी व्याख्या करण्यासाठी बनवलेली ही श्रेणी या ब्रँडने केलेल्या विस्ताराच्या पाठबळावर दाखल झाली आहे. आपली फ्रँचाईज स्टोअर्स तसेच कंपनीच्या मालकीची व कंपनी द्वारा संचालित एक्सपिरीयन्स स्टोअर्स बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ- लॉन्च करून या ब्रँडने आपली रिटेल उपस्थिती आधीच वाढवली आहे. या एक्सपिरीयन्स स्टोअर्समध्ये उपभोक्त्यांना डिझाईनर फिनिश श्रेणीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल.

प्रस्तुत लॉन्चविषयी बोलताना बिर्ला ओपस पेंट्सचे सीईओ रक्षित हरगवे म्हणाले, बिर्ला ओपस पेंट्समध्ये आम्ही हे जाणतो की उपभोक्ते उत्पादनापेक्षाही अधिक काहीतरी शोधत असतात. त्यांना उद्देश आणि मूल्य प्रतिबिंबित करणारे अनुभव आणि उत्पादने हवी असतात. आमचा उद्देश केवळ प्रगत डिझाईन टेक्नॉलॉजी आणि शाश्वत सोल्यूशन्ससह सर्जनशीलतेची पुनर्व्याख्या करण्याचा नसून इंटीरियर लक्झरीमध्ये नवे मापदंड स्थापित करण्याचा देखील आहे. देशभरात आम्ही लॉन्च केलेले पेंट स्टुडिओ आणि फ्रँचाईज स्टोअर्स यांच्या पाठबळावर आम्ही आता उपभोक्त्यांसमोर ही अप्रतिम फिनिश सादर करत आहोत, जी निसर्गाच्या सौंदर्यातून आणि इटालियन कारागिरीतून प्रेरित आहेत आणि ती नक्कीच तुमच्या घराला लक्झरीच्या अभिरुचीचा एक स्पर्श देतील.

ड्रीम रेंजमध्ये हाय-डेफिनेशन ३डी पॅटर्न्स आणि मेटॅलिक फिनिश आहेत, जी स्टेटमेंट वॉल्स निर्मितीसाठी उत्तम आहेत. यामध्ये १५० पेक्षा जास्त ट्रेंडी वॉटर-रेझिस्टंट शेड्स आहेत ज्यांचा टिकाऊपणा चांगला आहे आणि त्यांची सुंदरता दीर्घकाळ टिकणारी आहे. यामध्ये १४ विशेष डिझाईन्स आहेत, जी समुद्र, ढग आणि वृक्षांसहित निसर्गातील तत्वांमधून प्रेरित आहेत. प्रत्येक डिझाईनमध्ये १० रंग-संगती आहेत. अशा प्रकारे एकूण १४० अनोख्या डिझाईन आहेत, ज्या जागांचे रूपांतर आलीशान आणि वेधक वातावरणात करतात.

उपभोक्ते सध्या बिर्ला ओपस पेंट्सच्या डिझाईनर फिनिश रेंजचा अनुभव फ्रँचाइज स्टोअर्समध्ये आणि पेंट स्टुडिओजमध्ये घेऊ शकतात, जे अलीकडेच मुंबई (वरळी आणि वाशी), गुरुग्राम आणि लखनौ सारख्या मुख्य महानगरांत उघडली आहेत. बंगळूर, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, जयपूर, अहमदाबाद आणि सूरत सारख्या इतर स्थानी बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ सुरू करण्याची कंपनीची योजना आहे. तसेच, या ब्रँडच्या फ्रँचाईज स्टोअर्सच्या वाढत्या नेटवर्कसह, डिझाईनर फिनिशची उपलब्धता आणखी वाढवण्यात येत आहे. त्यामुळे देशभरातील ग्राहकांना सोयीचे होऊन ही उत्पादने सहज प्राप्त करता येतील.

# वागले की दुनिया मध्ये एका अनोख्या तिहेरी भूमिकेत परेश गणात्रा दाखल

मुंबई, ८ एप्रिल : सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत दाखवलेल्या मध्यमवर्गाचे दैनंदिन संघर्ष आणि त्यांच्यातील हृदयस्पर्शी क्षण पाहून ग्राहक त्या कथानकात गुंतून जातात. मालिकेतील धमाल वाढवण्यासाठी, परेश गणात्रा हा जेष्ठ विनोदी नट एका खास भूमिकेत या मालिकेत दिसणार आहे. ज्योती (भक्ती चौहान) च्या सुधांशु, हिमांशु आणि दीपांशु या तिळ्या भावांच्या भूमिकेत येऊन तो मालिकेची रंगत तिपटीने वाढवणार आहे. मालिकेतील आगामी कथानक प्रेक्षकांना जुन्या आठवणींची सैर घडवणार आहे. होते असे, की राजेश (सुमित राघवन), वंदना (परिवा प्रणती), अथर्व (शीहान कपाही) आणि सखी (चिन्मयी साळवी) यांना भूतकाळात राजेशने केलेल्या एका घोटाळ्याची आठवण होते. त्याने एक लग्न जुळवण्याचा विफल प्रयत्न केलेला असतो. वागले कुटुंबियांना आठवते की त्यावेळी राजेशने वंदनाची मैत्रीण संध्याचे लग्न डॉ. सुधांशु या कार्डियाक सर्जनशी जुळवण्याचा खटाटोप केला होता. त्यावेळी काही तरी गोंधळ होतो आणि संध्या सुधांशु ऐवजी चुकून त्याच्या दोन अगदी वेगळ्या प्रकृतीच्या भावांना भेटते. त्यापैकी हिमांशु खूप उग्र स्वभावाचा असतो, तर दीपांशु फारच हळव्या स्वभावाचा असतो. या गोंधळातून कॉमेडी ऑफ एरर्स उद्भवते, जी पाहताना प्रेक्षकांची हसून हसून पुरेवाट होईल.


सुधांशु, हिमांशु आणि दीपांशु या तीन भिन्न भिन्न स्वभावाच्या भावांची भूमिका करणारा परेश गणात्रा म्हणतो, वागले की दुनिया अशी मालिका आहे, जिच्यात वास्तवदर्शी कथानक हलक्या फुलक्या क्षणांनी फुलवले जाते. त्यामुळे या मालिकेत काम करण्याची संधी मला मिळाली, तेव्हा मला खूप आनंद झाला. एकाच वेळी तीन वेगवेगळ्या भूमिका करणे हे आव्हानात्मक तर खरेच, पण मी ते आनंदाने केले. या मालिकेतील कलाकारांसोबत काम करण्याचा आणि सुधांशु, हिमांशु आणि दीपांशु या व्यक्तिरेखा जिवंत करण्याचा माझा अनुभव खूप छान होता. मला आशा आहे की, हा गोंधळ पडद्यावर साकारताना मला जितकी मजा आली तितकीच मजा प्रेक्षकांना हा गोंधळ बघताना येईल.

# दाल बाटीपासून खाटू श्याम मंदिरापर्यंत: प्रिया ठाकूरची जयपूर डायरीज

**मुंबई, ८ एप्रिल :** झी टीव्हीवरील वसुधा ही मालिका आपल्या भावनिक आणि रंगतदार कथानकामुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. कथानक आता एक रंजक वळण घेत असून, अविनाश (इशांक सल्लुजा) आणि दिव्या (शुभांशी रघुवंशी) हे एकमेकांवरील प्रेम अखेर कबूल करतात. त्याचवेळी वसुधा (प्रिया ठाकूर) आणि देवांश (अभिषेक शर्मा) करिश्मा (प्रतिक्षा राय) चे खरे इरादे उघड करण्याचा प्रयत्न करतात. करिश्मा आणि अविनाशचं लग्न थांबवण्यासाठी हे चौघे एकत्र येतात आणि दिव्याच्या पुश्तैनी घरी जातात, जिथे ते तिच्या वडिलांची मान्यता मिळवण्याचा प्रयत्न करतात. या महत्त्वाच्या प्रसंगाचे चित्रण अधिक प्रभावी व्हावे म्हणून संपूर्ण टीम जयपूरला गेली होती आणि तिथल्या भव्य वास्तूशिल्प आणि समृद्ध संस्कृतीचा उपयोग या नाट्यमय घडामोडींसाठी पार्श्वभूमी म्हणून केला गेला.

मुख्य अभिनेत्री प्रिया ठाकूरसाठी हे शूट खास होते कारण ही तिची गुलाबी शहर जयपूरला पहिलीच भेट होती. कॅमेऱ्यांपलीकडे आणि शूटिंगच्या धावपळीतून वेळ काढून तिने जयपूरचं सौंदर्य आणि संस्कृती अनुभवली. स्थानिक लोकांशी संवाद साधणे, राजस्थानी वाक्प्रचार शिकणे अशा अनेक गोष्टींचा तिने अनुभव घेतला. मूळची खवय्या असलेल्या प्रियाने इशांक आणि शुभांशीसोबत राजस्थानचे खास पदार्थ प्याज कचोरी, दाल बाटी चुरमा आणि चाट यांचा मनसोक्त आस्वाद घेतला. एवढ्यावरच न थांबता संपूर्ण टीमने श्री खाटू श्याम मंदिरालाही भेट दिली, ज्यामुळे हा प्रवास आणखीनच संस्मरणीय ठरला.

# शब्दकोडे क्रमांक २०७९




**आडवे शब्द :-**
१) अतिशय श्रीमंत मनुष्य
६) झाडाभोवतीचा कट्टा
८) पडदा
१०) फळातील खाद्यभाग
११) पंख
१२) वेळ घालविणे
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) नोंदण्यासारखा गुन्हा
१७) आयुष्य
१९) बाई
२१) बोजा, भार
२४) देखावा, सजावट
२६) मत्स्य
२७) जास्तीतजास्त व कमीत कमी
२९) योग्यवेळी
३०) घबराटीमुळे होणारी धावपळ
३२) ईर्षा, बळ शक्ती, जोर
३३) फूल, पुष्प
३५) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३७) सापाने सोडलेली त्वचा
३८) गळ्यामागचा अवयव
३९) शेवट
४०) फोक, छडी
४१) लहान
४२) हात
४४) दक्षतेचा इशारा
४५) पक्ष, बाजू, काठ
४६) आरडाओरड, गोंधळ
४८) अलमारी
४९) पतिपत्नी
५१) केर
५३) हिन्दुस्थान
५५) गोष्ट विचारात घेणे (वा.प्र.)
५७) हत्तीचा शिक्षक
५८) उंच सखल नसलेले
६०) लाखाचा आकडा
६२) रतिचा पती
६३) लष्करी सिक्षण
६५) एक पालेभाजी
६६) सन्मानाची अल्प रक्कम
६७) उपयोग
६८) श्रीयुत, श्रीमान

**उभे शब्द :-**
१) दरिद्री माणूस
२) वरपांगी
३) गाडीचे छत
४) कळलाव्या मुनी
५) जावळा
६) भिंतीवर सरपटणारा प्राणी
७) गूढ
८) आजीची आई
९) छोटा
१२) पुण्याजवळचा एक घाट
१५) व्यय
१६) पर्जन्यकाळ
१८) नवरदेवाची आई
२०) विश्रांती
२२) चुकून, अजाणता
२३) कोकणी भाषेतील एक पोटभाषा
२४) आजूबाजूचा प्रदेश
२५) पुरापुरा अंदाज
२६) माप घेणे, मोजणे
२८) खून करणे (वा.प्र.), मारून रक्त पिणे
३१) तसराळे
३४) अंत:करण
३६) कमळासारखे सुंदर डोळे
३७) कर्णेंद्रिय
४०) सोने
४१) चीजवस्तू
४२) ज्वारीची वाळलेली ताटे, जनावरांचे खाद्य
४३) स्वत:ला
४५) युक्ती
४६) एक सुगंधी उष्ण पेय
४७) शस्त्र
५०) यमाचे घर
५२) सुकुमार व सुंदर
५३) स्तुती करणारा
५४) समशेर
५६) मंदिर
५९) पर्ण
६१) ऱ्हास, उतरती कळा नाश
६२) पुष्परस
६३) बशीचा जोडीदार
६४) अंधार
६५) बंधन, फास, फासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**




HDFC BANK
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय: एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई-४०००१३ आणि एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई - ४०००४२ येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून त्याचे एक कार्यालय आहे.

**लिलाव विक्री सूचना**

कर्जदारांना, विशेषत:, आणि सर्वसाधारणपणे जनतेला, याद्वारे सूचित केले जाते की खालील खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) ने कर्जाची थकबाकी भरण्यासाठी नोटीस देऊनही, त्यांनी स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार, ज्या कर्जदारांनी पैसे देण्यास चूक केली आहे त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांचा/सुरक्षिततेचा लिलाव आहे. बँकेने कर्जदारांना नोटीस देखील जारी केली होती ज्याद्वारे, खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, असे न झाल्यास पुढील नोटीस जारी न करता संपूर्ण तारण ठेवलेल्या सोन्याच्या सुरक्षिततेचा लिलाव करण्यास बँकेला स्वातंत्र्य असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आणि पेमेंट करण्यात अयशस्वी झाले, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करून तारण म्हणून कर्जदारांनी बँकेकडे दिलेले सोन्याच्या सुरक्षेवरील तारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि संपूर्ण सोन्याचे दागिने/सुरक्षा लिलावाद्वारे विकून आणि थकबाकी वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

१७.०४.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून खाली नमूद केलेल्या शाखेत लिलाव केले जातील. कोणत्याही तारण ठेवलेल्या तारखेचा लिलाव नमूद केलेल्या तारखेला आयोजित केला जाऊ शकत नाही किंवा पूर्ण केला जाऊ शकत नाही अशा स्थितीत, त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला आणि वेळेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

| कर्ज क्र | कर्जदाराचे नाव | कर्जाची रक्कम | लिलावाचे ठिकाण (शाखेचा पत्ता) |
|---|---|---|---|
| 75548554 | अब्दुल मुदस्सीर अब्दुलगफ्फार | 278000 | एचडीएफसी बँक लिमिटेड सेठी हाइट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 74871157 | जुवेरियापरवीन मोहम्मदसाजीद शेख | 151000 | |
| 75412694 | समीरअहमद नजीर अहमद | 41000 | |
| 74423705 | मोहम्मदफरहान मोहम्मदीरफान रेघीवाले | 32700 | |
| 75618003 | श्यामकुमार ब्रम्हदेव लिंगे | 59400 | एचडीएफसी बँक लिमिटेड रसिक प्लाझा, जयस्तंभ स्क्वेअर, मोर्शी रोड, अमरावती, महाराष्ट्र |
| 74833885 | गणेश संजय सोले | 32300 | एचडीएफसी बँक लिमिटेड पारस प्लाझा, शॉप नंबर १-१९, अप्पर ग्राउंड, एसबीआय जवळ, रिसोड रोड, वाशिम, महाराष्ट्र ४४४५०५ |
| 75141820 | विजय बाळू लटके | 68300 | वर्धने टॉवर, मिडसी गेट जवळ, बुटी बोरी, महाराष्ट्र ४४११०८ |
| 74868740 | सचिन नत्थुजी चांभारे | 42000 | एचडीएफसी बँक आयटीडी प्लॉट नं. २२५, २२६, एमपीएलएच नं. ८२, नझुल शीट नं. २७, ब्लॉक नंबर ११, नवीन शिवाजी वार्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र ४४२३०१ |
| 74837859 | कीर्ती धनराज मुद्दे | 28900 | |
| 74840817 | कल्पना रवींद्र काकडे | 20000 | |
| 75351603 | दिपांशू अतुलराव लोही | 160000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, फिलमार्केट, मेन रोड, काटोल, महाराष्ट्र ४४१३०२ |
| 74802152 | रामेश्वर मारोतराव घारपुरे | 42800 | |
| 74813334 | प्रविण रामदास काळे | 28000 | |
| 74841956 | मुहम्मदस्तिया अब्दुलकील शेख | 20231 | एचडीएफसी बँक लिमिटेड बस स्टँड समोर, नगर परिषद रोड, बल्लारपूर, महाराष्ट्र ४४२७०१ |
| 74834515 | विनोद भगवान कावल | 53000 | एचडीएफसी बँक लिमिटेड सराफा लेन, मेन रोड, बुलढाणा, महाराष्ट्र ४४३००१ |
| 74837310 | महेश भय्यालाल झळके | 20200 | प्लॉट क्र. १३/५, राजगोपालचारी वार्ड, भंडारा, महाराष्ट्र ४४१९०४ |
| 74886285 | अर्शद असद खान | 180100 | एचडीएफसी बँक लिमिटेड, कृष्णा हाइट्स, दुकान क्रमांक १२३४ ओख मार्क जथेरपेठ, अकोला-४४४००१ (महाराष्ट्र) |
| 74820288 | संदेश संतोष आवळे | 25000 | |
| 74842879 | शशिकांत शिवाजी पाटील | 82000 | एचडीएफसी बँक आयटीडी दीपक ट्रेडिंग जवळ, बस स्टँडच्या पुढे, एस नंबर २५५/डी, जिल्हा - बुलढाणा, मलकापूर, महाराष्ट्र ४४३१०१ |
| 75467751 | ज्ञानदेव बाळकृष्ण क्षीरसागर | 43600 | |
| 74866327 | विजय राघो सातो | 30600 | |
| 75430756 | रोशन मधुकर कपाळे | 77900 | एचडीएफसी बँक लिमिटेड, व्हीनस प्लाझा, शेगाव नाका स्क्वेअर, अमरावती - ४४४६०४ |
| 74858263 | लखन आसनदास हेमवानी | 22400 | |
| 74847081 | प्रीती राजेंद्र पोटे | 25000 | एचडीएफसी बँक आयटीडी शॉप नंबर १ आणि २, डायमंड मार्केट, दर्यापूर बनोसा, जिल्हा-अमरावती, दर्यापूर बनोसा, महाराष्ट्र ४४४८०३ |
| 75411356 | आदित्य राजेंद्र जोगी | 80000 | ओम निवास, मेन रोड, जिल्हा-अकोला, मूर्तिजापूर, महाराष्ट्र ४४४१०७ |
| 74870899 | मोहम्मदजाकीर शेख्यासिन | 29400 | |
| 75449921 | राहुल साहेबराव लाहे | 25000 | |
| 75518839 | सचिन हिरालाल ढोक | 75500 | प्लॉट क्र. ४३६/बी, श्री नारायण बिल्ड., बस स्टँडच्या पुढे, बस स्टँड रोड, ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र ४४१२०६ |
| 75417196 | जगजीवन लक्ष्मणराव रायपुरे | 49500 | |
| 75437601 | अक्षय गुणाजी ठाकरे | 35000 | |
| 74864073 | गेंडाबाई इमरत गद्रे | 35700 | मेधा पेट्रोल पंपासमोर, बस स्टँड जवळ, तळेगाव रोड, आर्वी, महाराष्ट्र ४४२२०१ |
| 74864438 | दिवाकर दत्तूजी कोराडे | 25000 | |
| 75374663 | आफरीनसदफ यासिर अहमदखान | 137500 | एचडीएफसी बँक लिमिटेड महेश भवन समोर, पोस्ट येथे - कारंजा (लाड), जिल्हा-वाशिम, कारंजा, महाराष्ट्र ४४४१०५ |
| 74860730 | गजानन विठ्ठल शेंडे | 103500 | |
| 74806526 | संतोष रमेश डोंगरे | 35000 | एचडीएफसी बँक लिमिटेड ९८/१, रेहान आझाद, कोल्हापूर रत्नागिरी रोड, मलकापूर, मलकापूर, महाराष्ट्र ४१५१०१ |
| 74807689 | सुयोग सुखदेव पाटील | 24900 | |
| 75280070 | नीलेशसिंग सुरेशसिंग वटपाल | 25000 | एचडीएफसी बँक लिमिटेड अप्पर ग्राउंड फ्लोर, श्री राम टॉवर, एनएच ६, नांदुरा, जि. बुलढाणा, नांदुरा, महाराष्ट्र ४४३४०४ |
| 74821829 | मनोज सोपान आढाव | 23000 | |
| 75364945 | श्रद्धा सुरेशचंद झांबड | 276900 | मेन रोड, नगर परिषद कार्यालयासमोर आर्णी, आर्णी, महाराष्ट्र ४४५१०३ |
| 462855534 | महेश गोपीचंद शेंडे | 71500 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला बसवार कॉम्प्लेक्स, समोर. नाहरू मार्केट, बस स्टँड जवळ, सावनेर, सावनेर, महाराष्ट्र ४४११०७ |
| 74867544 | सचिन कैलास बागडे | 130000 | एचडीएफसी बँक लिमिटेड वैभव हॉटेल समोर, गोरक्षण रोड, अकोला, महाराष्ट्र ४४४००१ |
| 74852710 | शेखफय्याज शेखहेजाज | 23800 | एचडीएफसी बँक लिमिटेड वरचा तळमजला, नेत्रा हाइट्स, बस स्टँड रोड, पातूर, जिल्हा अकोला-४४४५०१ |
| 74838880 | आकाश अशोक मडावार | 81000 | तळमजला, प्लॉट क्र. ११९, प्रथम फॅशन मॉल, पटेल वार्ड, देसाईगंज (वडसा), जिल्हा, गडचिरोली, महाराष्ट्र ४४१२०७ |
| 75332194 | लक्ष्मण विश्वनाथ जाधव | 51100 | तळमजला, कसारा नंबर ४-११५, धानकी रोड, उमरखेड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०६ |
| 75400847 | गणेश मोहनराव वानखेडे | 25000 | तळमजला, दुकान क्रमांक युजी५, युजी६, युजी ७ आणि युजी८, जगत टॉवर्स, ४डी, टिळक नगर, अमरावती रोड (एमजी रोड), नागपूर, महाराष्ट्र ४४००१० |
| 74822763 | जितेंद्र सतेंद्र सिंग | 230000 | एचडीएफसी बँक लिमिटेड तळमजला, ३१२१, कस्तुरबा रोड, सिटी हायस्कूल जवळ, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र ४४२४०१ |
| 74851322 | सय्यदनिशुद्दीन मतिउद्दीन सय्यद | 98700 | तळमजला, दुकान क्रमांक १, २, ३, ४, ९, १०, ११, १२, १३ आणि १४, नेहा मंगल कार्यालय, सी/ओ दुर्गा प्रसाद, अ.क्र. १४४/३, आर्णी रोड, जवळ, गुरु गजानन हॉटेल, दारव्हा, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र ४४५२०२ |
| 74828983 | विशाल गोपाळराव वाघ | 139000 | तळमजला, गणेश भवन, बुलढाणा अर्बन को-ऑप. सोसायटी लि समोर, मेनरोड, जळगाव जामोद, जि. बुलढाणा, महाराष्ट्र ४४३४०२ |
| 75599010 | राजेंद्र खेमराज रंगारी | 99500 | तळमजला, प्लॉट नं-७, दयानिधी, टिळक वाडी, बस स्टँड समोर, रामटेक जिल्हा - नागपूर, रामटेक, महाराष्ट्र ४४११०६ |
| 75392229 | गोपाळ दादाराव सगणे | 70800 | एचडीएफसी बँक लिमिटेड अडगोकर कॉम्प्लेक्स, एपीएमसी मार्केट समोर, अंजनगाव, सुर्जी, जिल्हा अमरावती, अंजनगाव सुर्जी, महाराष्ट्र ४४४७०५ |
| 74867425 | समाधान प्रल्हाद ढाकणे | 62000 | एचडीएफसी बँक लिमिटेड, श्री दत्त कॉम्प्लेक्स, शुभम हार्डवेअर, डोणगाव रोड, मेहकर, मेहकर, महाराष्ट्र-४४३१०१ |
| 74800016 | नरेंद्र पोचय्या अली | 59900 | तळमजला, प्लॉट नं.६, ज्योती रोड, बस स्टॉप जवळ, गडचांदूर, महाराष्ट्र ४४२९०८ |
| 74863668 | दसरापु सतीश | 44000 | |

लिलाव जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे या तत्त्वावर केला जाईल आणि बँक सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेटेज, वजन किंवा मूल्यांकनाबाबत कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही आणि देणार नाही. बोली लावण्यापूर्वी सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेटेज, वजन किंवा मूल्यांकनाची पडताळणी करणे, तपासणी करणे आणि स्वत:चे समाधान करणे ही संभाव्य खरेदीदारांची एकमेव आणि संपूर्ण जबाबदारी असेल आणि अशा हेतूसाठी, संभाव्य खरेदीदारांना त्यांच्या स्वत:च्या खर्चाने आणि वर दिलेल्या पत्त्यावर तपासणी करण्याची परवानगी असेल, सोन्याच्या वस्तू, लिलावासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या ४५ मिनिटे आधी, तज्ञांच्या सल्ल्यासह किंवा त्याशिवाय. सर्व बोली बँक या संदर्भात निश्चित करण्यास योग्य वाटेल अशा किमान राखीव किंमतीच्या अधीन असतील. लिलावाचे मूल्य आयबीजेए (इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लिमिटेड) नुसार मागील दिवशी सोन्याच्या बंद किंमतीवर आधारित असेल. अशा लिलावानुसार लिलाव प्रक्रिया आणि विक्री (जर असेल तर) बँक तिच्या स्वत:च्या विवेकबुद्धीनुसार लादण्यास योग्य वाटेल अशा पुढील अटी आणि शर्तींच्या अधीन असेल. जर वर नमूद केलेल्या कर्जदाराने कर्ज कराराच्या अटींनुसार बँकेला देय असलेली रक्कम वर नमूद केल्याप्रमाणे लिलावापूर्वी त्याच्या वैयक्तिक कर्ज खात्यात पूर्णपणे भरली, तर उक्त कर्जासाठी तारण ठेवलेले दागिने बँकेला पुढील कोणत्याही सूचना न देता लिलावातून काढून घेता येतील. कृपया लक्षात ठेवा की, पूर्वसूचना न देता लिलाव प्रक्रिया पुढे ढकलण्याचा किंवा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार बँकेच्या अधोस्वाक्षरीकृत अधिकृत अधिकाऱ्याचा आहे. आणि म्हणून कोणतेही कारण न देता आणि कोणतेही किंवा सर्व बोली किंवा ऑफर कोणतेही कारण न देता नाकारणे.

एसडी/-
तारीख: ०९.०४.२०२५
ठिकाण : नागपूर
प्राधिकृत अधिकारी
एचडीएफसी बँक लि.

## पो.स्टे. ला येणाऱ्या महिला बळकटीकरण योजने अंतर्गत संगणक, खुर्ची व टेबल चे वितरण

**अकोला :** राज्यातील पोलीस स्टेशन मध्ये महिला मदत कक्ष ( वुमेन हेल्प डेक्स) स्थापन करणे / बळकटीकरण करणे या योजने अंतर्गत पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरिता येणाऱ्या तसेच चारित्र / पासपोर्ट पडताळणी, व इतर चौकशी अनुषंगाने पो.स्टे. ला भेट देणाऱ्या महिलांचे सहाय्य व सुविधेकरिता तसेच त्या संदर्भातील कामकाज जलद गतीने व सुलभतेने होवुन त्याचे अद्ययावत रेकॉर्ड ठेवता यावे याकरीता संगणक खुर्च्या व टेबल इत्यादी साहित्य उपलब्ध झाले आहे.आज दिनांक



०८/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा अकोला पोलीस दलातील सर्व २३ पोलीस स्टेशनला प्रत्येकी १ नग संगणक, १ नग संगणक टेबल व १० नग प्लास्टीक खुर्च्या या साहित्याचे मा. श्री बच्चन सिंग (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या हस्ते पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रांगणात साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले. सदर साहित्य वाटप कार्यक्रमाकरिता सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधीकारी, तसेच सर्व शाखा प्रभारी अधिकारी उपस्थित होते. घेतली. सदर चा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता राखीव पोलीस निरीक्षक श्री गणेश जुमनाके व पथक यांनी मेहनत घेतली.

# जिल्हा गुंतवणूक परिषदेत १ हजार २३८ कोटींचे सामंजस्य करार जिल्ह्याचा भविष्यातील विकासाचा आशादायी आलेख : जिल्हाधिकारी अजित कुंभार

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** जिल्हा गुंतवणूक परिषदेत आज विविध ९५ उद्योग-व्यवसायांशी सामंजस्य करार करून जिल्ह्यात १ हजार २३८ कोटी रू. गुंतवणूकीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आहे. गुंतवणूकीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण तयार झाले आहे. याद्वारे जिल्ह्याचा भविष्यातील विकासाचा आशादायक आलेख निर्माण होत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.जिल्हा उद्योग केंद्रातर्फे मूर्तिजापूर रस्त्यावरील हॉटेल आर. जी. एक्सक्लुसिव्ह येथे आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली.

त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, उद्योग सहसंचालक नीलेश निकम, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, नगररचना सहायक संचालक सादिक अली, अकोला जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, राज्याच्या, तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेत २०२८ पर्यत दुपटीने वाढ करण्याचे उद्दिष्ट असून, त्यादृष्टीने शासनाकडून



पावले उचलण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत जिल्ह्याचा जीडीपी ३६ हजार कोटींचा आहे. तो वाढविण्यासाठी भक्कम सुविधांची आवश्यकता आहे. रेल्वे संपर्क, वैद्यकीय सुविधा ही जिल्ह्याची बलस्थाने आहेत. विमानतळ विकासासाठी आवश्यक भूसंपादन आदी प्रयत्न होत आहेत. एमआयडीसी विस्तारित जागेसाठी बोरगाव मंजू भागात पाहणी करण्यात आली आहे.राज्य शासनाच्या सातकलमी कार्यक्रमानुसार गुंतवणूक प्रसार, इज ऑन लिव्हिंग या मुद्द्याचा प्राधान्याने समावेश करण्यात आला. त्यासाठी सुलभ व जलद परवानगी प्रक्रिया, तसेच मैत्री २.० एकल खिडकीतून विविध सुविधा देण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

उद्योजकांना समाजकंटकांकडून काही त्रास झाल्यास पोलिस ठाण्यात तक्रार करावी. सायबर गुन्हे घडू नयेत यासाठीही खबरदारी घेणे गरजेचे आहे, असे पोलीस अधिक्षक श्री. सिंह यांनी सांगितले.

**दोन हजारहून अधिक तरूणांना रोजगार**

परिषदेत ९५ उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार झाला. त्यामुळे सुमारे दोन हजारहून अधिक लोकांना रोजगार मिळणार आहे. रिलायन्स सीएनजी प्लांटम धून १२० कोटींची गुंतवणूक होणार आहे.

जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून राज्याच्या विकासाला चालना देणे या हेतूने परिषदेचे आयोजन करण्यात आले, असे श्री. बनसोड यांनी सांगितले.

परिषदेत जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील गुंतवणूकदार व राज्य शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले. गुंतवणुकीला प्रोत्साहन, औद्योगिक सुविधा, व्यवसाय सुलभीकरण, तसेच उद्योगासाठी आवश्यक परवानगी आणि सेवा काल मर्यादित देण्याच्या दृष्टीने कायदे आदीविषयीचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून करण्यात आले.

## उजैर अहमद शेख वयाच्या २५ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्ना मध्ये झालेत न्यायाधिश

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** दि. उजैर अहमद शेख, वयाच्या २५ व्या वर्षी न्यायाधिश, क.स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग या पदावर नियुक्त होऊन त्यांनी स्वतः चे व आईवडिलांचे व अकोला वासियांचे नाव उज्वल केले आहे. आपल्या स्वतःच्या कठीण परिश्रमाने व मन लावुन केलेल्या परिश्रमामुळेच ते न्यायाधिश होण्यामध्ये यशस्वी झाले आहेत. आपल्या यशाचे श्रेय आपल्या आईवडिलांना ते देतात. त्यांचे वडील श्री नसीर अहमद शेख हे सुद्धा पेशाने एक नामांकीत वकील आहेत व आई डॉ. रिजवाना परवीन ह्या सुद्धा मुख्याध्यापिका पदावर कार्यरत आहेत. आपल्या



आईवडिलांच्या संस्कारामुळे व त्यांच्या मार्गदर्शनानेच व बिकट परिस्थितीवर मात करून, संघर्ष करूनच ते न्यायाधिश या पदावर नियुक्त झाले आहेत ही अकोला वासीयांकरीता व मुस्लीम सम ाजाकरीता अत्यंत अभिमानाची बाब आहे. त्यांनी घेतलेली मेहनत व मन लावुन केलेला अभ्यास हे आज युवा वर्गासाठी एक प्रेरणा दायी ठरते यामुळेच स्वप्न साकार होऊ शकते असे त्यांना वाटते.

## जी.एम.सी. च्या अधिष्ठाता मिनाक्षी गजभिये यांच्या वर गुन्हा दाखल करण्याची मागणी

### गजभिये यांच्या सांगण्यारुन तक्रारकर्त्याला विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकऱ्यांन कडुन जिवे मारण्याच्या धमक्या

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** अकोला सर्वोपाचार रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ . मीनाक्षी गजभिये यांची आंतर जिल्हा बदली करण्यासाठी व कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ऋषभ राजेश काळे यांनी मुख्यमंत्री आपले सरकार पोर्टल वर तक्रार दाखल केली होती. ही तक्रार दाखल केल्यानंतर डॉ मीनाक्षी गजभिये यांच्यावर मंत्रालयातून चौकशी सुरू असल्या मुळे डॉ मीनाक्षी गजभिये यांनी विविध राजकीय पक्षांच्या अधिकाऱ्यांना भेटून ऋषभ काळे यांच्यावर तक्रार मागे घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करणे सुरू केले व डॉ मीनाक्षी गजभिये यांच्या विरुद्ध दिलेली तक्रार मागे घे नाहीतर गुंडाना सुपारी देऊन तलवारीने कापून टाकण्याची धमकी दिली. या प्रकरणी डॉ मीनाक्षी गजभिये यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ऋषभ काळे यांनी पोलिस अधिक्षक कार्यालय मध्ये डॉ मीनाक्षी गजभिये यांच्या विरोधात लेखी तक्रार दाखल केली.

## विधीसंघर्षग्रस्त बालकांना कौशल्य विकासाचे मार्गदर्शन

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** जीवनात यश मिळविण्यासाठी वेळेचे नियोजन व संयम पूर्वक वाटचाल आवश्यक असल्याचे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एम. एस. भदाने यांनी येथे सांगितले.बाल न्याय मंडळ, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व एन्करेज एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी आयोजित कौशल्य विकास व उद्योजकता व रोजगार मार्गदर्शन शिबीरात त्या बोलत होत्या. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.

जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एम.एस. भदाणे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. योगेश पैठणकर, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती सुवर्णा कुळकर्णी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर,बाल कल्याण समिती अध्यक्ष ॲड. अनिता गुरव, महेंद्र गणोदे,




राजु लाडुलकर, राजेश देशमुख आदी उपस्थित होते.जिल्हा उद्योग केंद्राचे प्रसन्न रत्नपारखी यांनी उद्योगांच्या संधींबाबत माहिती दिली. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या प्रियंका पोटे यांनी विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. पद्माकर सदाशीव, बाल कल्याण समितीच्या सदस्य प्रांजली जैस्वाल, ॲड. शीला तोष्णीवाल यांनीही मनोगत व्यक्त केले. श्रीमती कुळकर्णी यांनी प्रास्ताविक केले. ॲड.सारिका घिरणीकर यांनी सूत्रसंचालन केले.बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडूलकर,शिवराज पाटील, वैशाली भटकर, भाग्यश्री घाटे, शुभम झरकर, हर्षाली गजभिये, रेवत खाडे, शंकर वाघमारे, सपना गजभिये, कपील बहाड, कैवल्य जैस्वाल, उमेश मेश्राम, देवेश खंडारे, गजानन सोनोने, संगीता पातोडे यांनी सहकार्य केले.

## आमदार नितीन देशमुख दोन समित्यांचे सदस्य !

**अकोला :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपनेते तथा बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांची शासनाच्या रोजगार हमी योजना समिती आणि पंचायतराज समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.यासंदर्भातील लेखी आदेश राज्य शासनाने जाहीर केले आहेत. त्यामध्ये आमदार नितीन देशमुख यांचा समावेश आहे. रोजगार हमी योजना समिती मध्येही आमदार नितीन देशमुख यांची रोहयोसह नियुक्ती शासनाने केली आहे. या समितीचे मुख्य पंचायतराजचे सदस्य उद्दिष्ट ग्राम ीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी रोजगार निर्माण



करणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन शाश्वत रोजगार उपलब्ध करणे आहे. आमदार नितीन देशमुख यांच्या या नव्या जबाबदारीमुळे जिल्ह्यातील नागरिकांना मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या समि त्यांचा कार्यभार महत्त्वपूर्ण असून, पंचायतराज समितीच्या कार्यक्षेत्रात राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना सक्षम बनवणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सुधारणा करणे तसेच ग्रामीण विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.सुनिश्चित करणे यांचा समावेश आहे.

## राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी अर्ज मागविले

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.वयोगट ५ ते १८ वर्षांदरम्यान शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रांत विशेष नैपुण्य दर्शविणा-या बालकांना हा पुरस्कार दिला जातो. ऑनलाईन अर्ज 'अवॉर्ड.जीओव्ही.इन' https://awards.gov.in या संकेतस्थळावर स्वीकारले जातील.दि. ३१ जुलै २०२५ रोजी पाच वर्षांहून अधिक व १८ वर्षांहून कमी वय असलेल्या मुलांसाठी अर्ज करता येईल. अर्ज मुले किंवा त्यांच्या वतीने पालक, सामाजिक कार्यकर्ता किंवा राज्य सरकार, जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायतराज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदी अर्ज करू शकतात, असे महिला व बालविकास विभागातर्फे सांगण्यात आले.

# भगव्या झेंड्यांनी नटले मूर्तिजापूर; 'जय श्रीराम' च्या निनादात शहर रोमांचित!

■**मुर्तिजापुर,दि ८ (प्रतिनिधी):** श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त मूर्तिजापूर शहरात रविवारी सकाळी भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सार्वजनिक श्रीराम नवमी जन्मोत्सव समिती आणि सकल हिंदू समाज मूर्तिजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या रॅलीने संपूर्ण शहरात उत्साहाची लाट उसळवली.जुनी वस्तीतील श्रीराम मंदिर आणि स्वामी समर्थ मंदिर येथून प्रारंभ झालेल्या या रॅलीने महाराजा चौक, मोरारजी चौक, वीर भगतसिंग चौक, बायपास रोड, कारंजा चौक, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक व रेल्वे स्टेशन परिसरातून विजयदिंडीसारखी वाटचाल करत स्टेशन परिसरातील श्रीराम मंदिराजवळ समारोप गाठला.रॅलीमध्ये युवक-युवती भगवे दुपट्टे परिधान करून, गाडीला आणि हातात भगवे झेंडे लावून 'जय श्रीराम! जय जय श्रीराम!' च्या घोषात सहभागी झाले.

या दिवशी मूर्तिजापूरचे रस्ते, चौक, गल्लीबोळ भगव्या रंगात न्हाल्यासारखे दिसत होते.हजारोंच्या संख्येने नागरिकांनी या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रभू श्रीरामांप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

या निमित्ताने संपूर्ण शहरात भगवे झेंडे, पताका फडकावण्यात आले होते. सर्वत्र धार्मिक, उत्साही आणि भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.या भव्य रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मूर्तिजापूर पोलिसांनी अत्यंत सुस्थितीत बंदोबस्त तैनात केला होता. सर्व



कार्यक्रम शांततेत, शिस्तबद्ध आणि जल्लोषात पार पडल्याने नागरिक व आयोजकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

श्रीराम नवमीच्या निमित्ताने मूर्तिजापूर शहराने एकजूट, श्रद्धा आणि संस्कृतीचा अद्वितीय असा जागर अनुभवला. ही रॅली हिंदू एकतेचे प्रतीक ठरली असून, शहराच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासात एक उजळणारी घटना म्हणून नोंदवली जाईल.

## हिरपूर येथे जयाजी महाराज यात्रा महोत्सव

### एकाच वेळी पाच बैलगाड्या ओढण्याची परंपरा

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर तालुका अनेक संतांचा वारसा लाभलेला आहे. त्यापैकी हिरपूर येथे श्री जयाजी महाराजांचे जागृत देवस्थान आहे. या मंदिरात दरवर्षी एप्रिल महिन्यात चैत्र शुद्ध बारसला असते.यावर्षी दि. ९ /४ /२०२५ बुधवार ला यात्रा महोत्सव साजरा होत आहे. या यात्रेकरिता सासुरवाशीन मुली पतीसह आवर्जून उपस्थित राहतात.

या दिवशी संपूर्ण गावामध्ये प्रत्येकाच्या घरी महाप्रसाद म्हणून रोडगे बनवले जातात. विशेष म्हणजे या यात्रेत बैलगाडा ओढण्याची परंपरा आहे. मनोकामना पूर्ण करण्यासाठी भक्त सात दिवस एक वेळा फक्त दूध घेऊन उपवास करतो व यात्रेच्या दिवशी पाच बैलगाड्या एकाच वेळी ओढतो. या बैलगाडीमध्ये शे-१५० लोक बसतात. या प्रकाराला गाडपगार म्हणतात.ल ही गाडपगाराची प्रथा शेकडो वर्षापासून प्रचलित आहे. हिरपूर येथे जयाजी महाराज जागृत देवस्थान असल्यामुळे भक्तांची नेहमीच वर्दळ असते. या देवस्थानच्या परंपरेला शेकडो वर्षाच्या इतिहासाची किनार लाभली आहे. आख्यायिकेनुसार हिरपूर येथे बलंग घराणे वास्तव्यास होते. याच घराण्यामध्ये सदाजी व गिरजाबाई दांपत्याच्या पोटी जयाजी महाराजांचा जन्म झाला. दोघेही धार्मिक वृत्तीचे असल्याने बालपणीच भक्तीचे संस्कार त्यांच्यावर पडले.

जयाजी महाराज वयाच्या बाराव्या वर्षेपर्यंत गुरे चारत होते .महादेवावर त्यांची प्रचंड श्रद्धा होती. या भक्तीमुळे त्यांची शिखर शिंगणापूरला जाण्याची इच्छा बालपणीच पूर्ण झाली. कुंभमेळ्याच्या पर्वावर जयाजी महाराजांनी त्रिशूल घेऊन मोठ्या महादेवाची पायदळ वारी केली होती. दौलतराव उंबरकर हे



संत जयाजी महाराजांचे निष्ठावंत भक्त होते. त्यांचे वडील सोनाजी उंबरकर यांनी देखील बारा वर्ष मोठ्या महादेवाची काठी घेऊन पायदळ वारी केली. त्यांनीच मंडई व शंखनाथ स्तवन गायनाची प्रथा रूढ केली. दौलतरावच्या मृत्यूनंतर मुलगा संपतराव यांनी हा वारसा सुरू ठेवला. वीस वर्षे त्यांनी शिखर शिंगणापूरच्या पायदळवाऱ्या केल्या. मनोकामना पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व समाज व जातीचे भाविक भक्त गारपगाड ओढतात. पाच बैलगाड्यांमध्ये भरगच्च म ाणसे बसतात व एकटा फक्त कमरेला आकोडा लावून या बैलगाड्या ओढतो. ही परंपरा आजही कायम आहे. तरी सर्व भक्तांनी या यात्रा महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आव्हान मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

**मूर्तीनसलेले एकमेव देवस्थान**

प्रत्येक देवस्थानावर देवाची मूर्ती किंवा प्रतिमा आढळून येते. मात्र हिरपूर येथे श्री संत जयाजी महाराजांची मूर्ती किंवा कोणत्याही प्रकारचे छायाचित्र उपलब्ध नाही. फक्त त्या जागेचे भक्त दर्शन घेतात. श्री जयाजी महाराज हिरपूरचे ग्रामदैवत आहेत. तसेच पंचक्रोशीतील अनेकांचे कुलदैवत आहे.

## शाहबाबु उर्स व कव्वाली कार्यक्रम

■**पातुर,दि ८ (प्रतिनिधी):** हजरत शाह अब्दुल अजीज. उर्फ शाहबाबु ( र अ ) यांच्या ७९९ उर्स शरीफ दर वर्षी प्रमाणे साजरा करणयात रेत आहे या निम्मत कव्वाली कार्यक्रम चे आयोजन हाजी सै कमरोद्दीन यांनी केले आहे दिनांक ०८/०४/२०२५ रोजी संदल कार्यक्रम असतील तर दिनांक ०९/०४/२०२५ रोजी कव्वाली कार्यक्रमात प्रसिद्ध कव्वाल गुलाम वारीस तर १०/०४/२०२५ रोजी कव्वाल जुनेद सुलतानी व ११/०४/२०२५असलम साबरी यांची सुद्धा कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन आयोजक द्वारे करणयात आले आहे सदर कार्यक्रम शाह बाबू मैदान मुजावर पुरा पातुर येथे दुपारी



०२/ ते रात्रि १० वाजे पर्यंत राहील सदर कार्यक्रमाला विदर्भ सह महाराष्ट्रातुन श्रद्धालु आपली मनोकामना घेऊन शाहबाबु दरगाह वर येतात सर्व भाव भकतांना श्रोतानी कार्यक्रमाला उपस्थित राहावे अशी विनती हाजी सै कमरोद्दीन यांनी केली

## लोकसंचालीत साधन केंद्र कार्यालयात सर्पमित्रानी पकडला विषारी नाग

बार्शीटाकळी: येथे काल दुपारी लोकसंचालीत साधन केंद्र कार्यालयात कोब्रा जातीचा विषारी नाग आढळून आला. कर्मचारी आपापल्या कामात असताना विषारी साप पाठीमागच्या दरवाजामधून कॅम्पुटर रूम मध्ये जाताना दिसला. सर्पमित्र विकी उमाळे यांना बोलवण्यात आले. उमाळे ऑफ्रिसमध्ये पोहोचले आणि सापाला शोधून काढले. सापाला पकडून ऑफिस मधील कर्मचारी व महिलांच्या मनातली भीती काढली सापा विषयी माहिती दिली व त्याल जीवनदान दिले.

## पुंडलीकबाबा आश्रम राऊतवाडी येथे मुंगसाजी महाराज ग्रंथ सामुदायीक पारायण सोहळा

■**अकोला,दि ८ (प्रतिनिधी):** श्री परमहंस पुंडलीक महाराज आश्रम राऊतवाडी, अकोला येथे 'श्री' च्या आगमणाप्रित्यर्थ सामुदायीक जीवनामृत पारायण सप्ताह आयोजित करण्यात आहे. प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही मंगलवार दि.०८ एप्रिल पासून ते दि.१५ एप्रिल २०२५ पर्यंत भगवान मुंगसाजी माऊली जिवनामृत ग्रंथाचे सामुदायीक पारायण आयोजीत केले आहे. तसेच दि. १४/४/२०२५ ला परमहंस पुंडलिक बाबा, पुंडलिक नगर, मुर्तिजापुर यांचे पालखीचे आगमन होईल व गायनाचार्य नारायण महाराज काळे, मृदगाचार्य ज्ञानेश्वरमहाराज इंगळे, अंबिकापूर, सर्व टाळकरी दूधाळा. संध्याकाळी ५ ते ७ हरीपाठ होईल व नंतर ७ ते ९ ह.भ.प. दिलिप महाराज पान्हेरा यांचे हरीकिर्तन होईल.

दि. १५/४/२०२५ ला सकाळी



७ ते ९ श्री च्या पालखीची मिरवणूक निघेल. बाबांचे लहान बंधू ह.भ.प. विठ्ठलदेव पातोंड हे हजर राहतील. नंतर ह.भ.प. योगेश महाराज खवले यांचे काल्याचे किर्तन होईल. दहीहांडी कार्यक्रम परमहंस पुंडलिक देव यांचे वंशज ह.भ.प. विवेकभाऊ पांतोड व्यवस्थापक



पुंडलिक महाराज संस्थान मुर्तिजापूर यांचे हस्ते होईल. नंतर 'महाप्रसाद'. 'जिवनामृत ग्रंथांचे व्यासपीठ' ह.भ.प. हरीमहाराज तालोट यांचे राहील. पारायणाची वेळ सकाळी १० ते १२ असेल. प. पुंडलीकबाबा आश्रम राऊतवाडी, अकोला येथे मुंगसाजी महाराज ग्रंथ सामुदायीक पारायण सोहळा व ह.भ.प. सोनुमहाराज कुळकर्णी यांचे संगीत शिवपुराण : संध्या. ६ ते ९ वा. होईल. दि. १५/४/२०२५ ला दुपारी १२.३० 'महाप्रसाद' होइल. ज्या भावीक भक्तांनी उत्सवाप्रित्यर्थ देणगी अगर अन्नदान करावयाचे असल्यास त्यांनी आश्रमात आणून द्यावे. ऑनलाईन पेमेंटसाठी बँक दि जनता कर्मशियल बैंक, तापडीया नगर शाखा, तात्यासाहेब ओक मार्ग, जठारपेठ चौक, अकोला अ/ल. छे. ००९१०३२०१०१०९७५ ठढन्न्ड/ छएन्न्ढ खन्न्डउ: अघगइ००००००९ प्रेषक व्यवस्थापक तथा समस्त विश्वस्त मंडळ, श्री परमहंस पुंडलीक महाराज आश्रम राऊतवाडी, (ट्रस्ट र.नं.ई-३५५) अकोला. मो. ७७०९९२१८०९, ०७२४-२४५६५९८. भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन धनराज घटाळे यांनी केले आहे.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन [illegible] +स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन [illegible] +(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय



## लठ्ठपणा घालवणे झाले सोपे

**डॉ. प्रसन्न नेने**

सध्या लठ्ठपणामुळे कोट्यवधी लोक त्रस्त आहेत. मात्र आता लठ्ठपणापासून मुक्ती मिळवण्यासाठी अमेरिकन कंपनीने एका इंजेक्शनचा शोध लावला आहे. वजन घटवण्यासाठी करण्यात येणाऱ्या सर्जरीला या इंजेक्शनचा सक्षम पर्याय निर्माण झाला आहे.

लठ्ठपणा कमी करण्यासाठी आता जीममध्ये जाऊन घाम गाळणे नको. पहाटे उठून धावायला नको की डाएट प्लॅनही नको... आता आठवड्यातून एकदा एक इंजेक्शन घेतले की वजन कमी होण्यास सुरुवात होते. लठ्ठपणाने त्रस्त असणाऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. अमेरिकेतील आघाडीची फार्मा कंपनी 'एली लिली'ने भारतात वजन कमी करण्याचे हे औषध आणले आहे. 'सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन' कडून मान्यता मिळाल्यानंतर 'माउंजारो' हे औषध आता भारतात उपलब्ध झाले आहे.

काय होईल?

'एली लिली' या कंपनीच्या इंजेक्शनमुळे २१ किलोपर्यंत वजन कमी होईल तसेच चरबी नाहीशी होईल असा दावा करण्यात आला आहे. कंपनीचा दावा आहे, की हे औषध लठ्ठपणा आणि टाइप २ मधुमेहासाठी तयार करण्यात आले आहे. लठ्ठपणा कमी करणाऱ्या इंजेक्शनची किंमत भारतात खूपच कमी ठेवण्यात आली आहे. या औषधाच्या पाच एमजीच्या कुपीची किंमत ४३७५ रुपये तर २.५ एमजीच्या कुपीची किंमत ३,५०० रुपये निश्चित करण्यात आली आहे.

इंजेक्शन कधी घ्यायचे?

'माउंजारो'चे हे इंजेक्शन आठवड्यातून एकदा घ्यावे लागते. 'न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन'ने प्रकाशित केलेल्या क्लिनिकल ट्रायलनुसार, योग्य आहार आणि व्यायामासह हे औषध घेत होते अशा लोकांचे त्यांनी १५ मिलीग्रॅमच्या डोसमध्ये ७२ आठवड्यात सुमारे २१.८ किलो वजन कमी केले. त्याच वेळी पाच मिलीग्रॅम डोससह १५.४ किलो वजन कमी केले आहे. धावणे, सूर्यनमस्कार, योगासने अशा उपायांनी वजन कमी करणे, तंदुरुस्त राहणे हा उत्तम मार्ग आहेच पण धकाधकीच्या जीवनशैलीत सगळ्यांकडेच वेळ कमी आहे. त्यामुळे ओबॅसिटी सर्जरीवर हे इंजेक्शन एक चांगला पर्याय ठरू शकेल. पण त्याचे किती सकारात्मक परिणाम दिसतात हे पाहण्यासाठी काही दिवस वाट पाहावी लागेल.

## ॲसिडीटी होतेय?



**सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ खातो. ते पचवण्यासाठी पोटाला खूप मेहनत करावी लागते. त्यामुळे अनेकदा बद्धकोष्ठता, गॅसेस, सूज येणे अशा समस्या उद्भवतात. पोटात हायड्रोजन, कार्बन डायऑक्साइड आणि मिथेन वायू तयार होतात. त्यामुळे आम्लता निर्माण होते. त्यामुळेच पोटात वरचेवर गॅस तयार होत असेल तर अन्नाचे पचन नीट होत नसल्याचे समजावे. सध्या प्रत्येक तिसरा माणूस याने त्रस्त दिसतो. तेलकट, तळलेले, तिखट, मसालेदार अन्न खाणे; रात्री उशिरापर्यंत जागे राहणे, कमी पाणी पिणे, राग आणि तणाव आदी ॲसिडिटीची प्रमुख कारणे आहेत. तळलेले अन्न सेवन केल्यानंतर ॲसिडिटीचा त्रास होत असेल तर घाबरण्याची गरज नाही. काही सोपे घरगुती उपाय करून तुम्ही या समस्येपासून आराम मिळवू शकता.**

**डॉ. मेघा दळे**

उपाय काय?

- तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर थंड पाणी पिणे टाळा. त्याऐवजी कोमट पाणी प्या. यामुळे पचनक्रिया सुधारेल आणि ॲसिडिटीपासून आराम मिळेल. जेवणानंतर १५-२० मिनिटांनी एक ग्लास कोमट पाणी प्या. दिवसभर पुरेशा प्रमाणात पाणी प्यायल्याने पचनक्रिया व्यवस्थित चालते.
- बडीशेपमध्ये अँन्टी ॲसिडिक गुणधर्म असतात. ते पोटात तयार होणारे अतिरिक्त ॲसिड कमी करण्यास मदत करतात. म्हणूनच जेवणानंतर एक चमचा बडीशेप चावून खावी. एका ग्लास गरम पाण्यात बडीशेप उकळवून हे कोमट पाणी प्यायल्यास आराम मिळतो.
- आले पोट शांत करण्यास आणि गॅस्ट्रिक ॲसिड नियंत्रित करण्यास मदत करते. म्हणूनच एक इंच आले एक कप पाण्यात उकळून त्यात थोडे मध घालून प्या. आले किसून लिंबू पाण्यात मिसळूनही तुम्ही पिऊ शकता.
- * केळी खाल्ल्याने ॲसिडिटी लगेच शांत करते. म्हणूनच तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर एक पिकलेले केळे खा. हे शेक किंवा स्मूदीच्या स्वरूपातदेखील घेतले जाऊ शकते. ते पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.
- दुधात कॅल्शियम असते. ते पोटात तयार होणारे ॲसिड संतुलित करते. म्हणूनच अपचनाचा त्रास असल्यास साखर न घालता अर्धा कप थंड दूध प्या. अर्थात खूप थंड दूध पिऊ नका.
- सेलेरी आणि काळे मीठ घ्या कारण सेलरीमध्ये पाचक एंजाइम असतात. ते पचन सुधारतात आणि आम्लता कमी करतात. अर्धा चमचा सेलेरी आणि चिमूटभर काळे मीठ कोमट पाण्यासोबत घ्या. सेलेरी पाण्यात उकळूनही पिऊ शकता.
- नारळाच्या पाण्यामुळे पोटातील ॲसिडची पातळी कमी होते आणि शरीर हायड्रेट राहते. दिवसातून दोनदा, शक्यतो सकाळी रिकाम्या पोटी नारळाचे पाणी प्या. जेवल्यानंतर एक तासाने हे पाणी पिल्यानेही खूप आराम मिळतो.
- हा त्रास असेल तर हिरव्या पालेभाज्या खा. पालक, मेथी, टोमॅटो यासारख्या हिरव्या भाज्या पोटासाठी फायदेशीर असतात आणि त्या ॲसिडिटी नियंत्रित करतात. त्यामुळे आहारात जास्तीत जास्त हिरव्या भाज्यांचा समावेश करा. तळलेल्या पदार्थांऐवजी उकडलेल्या किंवा हलक्या शिजवलेल्या भाज्या खाल्ल्यास जास्त फायदा होतो.

## 'इंटरनेट ओव्हरलोड' होतोय?

**वेगळं काही...**

इंटरनेटचे आपलं जग व्यापून टाकलं आहे. स्मार्टफोन, सोशल मीडियाशिवाय काही काळ घालवणंही कठीण होऊन बसलं आहे. दर दोन मिनिटांनी व्हॉट्स ॲप तपासलं जातं. फोन बंद असेल तर अस्वस्थ वाटतं. सकाळी उठल्यावर पहिल्यांदा फोन हातात घेतला जातो. मेसेज न आल्यास सतत इंटरनेट कनेक्शन तपासलं जातं. हे फक्त एकदोघांच्या बाबतीत नाही तर अनेकांच्या बाबतीत घडत आहे. पण ही सर्वसामान्य बाब नाही. याला 'इंटरनेट ओव्हरलोड' असं म्हणतात.


इंटरनेट ओव्हरलोडमुळे आपल्या मेंदूला इंटरनेटच्या वेगाची सवय होते. त्याला वेगवान घडामोडी आवडू लागतात आणि मुलांशी खेळणं, गप्पा मारणं, बागकाम, स्वयंपाक करणं अशा तुलनेने मंदगतीच्या कृतींशी जुळवून घेणं मेंदूला जमत नाही. यामुळे अस्वस्थता वाढत जाते. अर्थात यावरही उपाय आहेच. तुमच्यातही इंटरनेट ओवहरलोडची ही लक्षणं दिसत असतील तर काही उपायोजना करायला हव्यात.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपण किती वेळ ऑनलाईन असतो, याचा हिशेब ठेवा. यासाठी विविध ॲप्सचा उपयोग होऊ शकतो. तुम्ही फोनमध्ये किती वेळ घालवता, हे सांगणारी काही ॲप्स आहेत. फोन हातात घेण्याआधी



आणि नंतर मनात कोणत्या भावना येतात, कसं वाटतं हेही नोंदवून ठेवा. एकटेपणा किंवा अस्वस्थतेमुळे बरेच जण सतत ऑनलाईन असतात. त्यामुळे इंटरनेटच्या वापराची नियमावली तयार करा. किती वेळ ऑनलाईन रहायचं हे ठरवा. दिवसाची एक वेळ ठरवून घ्या. त्याच वेळेत ईमेल तपासणं, सोशल मीडियावरचे मेसेज बघणं ही कामं करा. ही वेळ संपल्यावर फोन बाजूला ठेवा किंवा डाटा बंद करून टाका आणि दुसरं काम करायला लागा. महिन्यातल्या एखादा दिवस इंटरनेट मुक्त आयुष्य जगा. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत इंटनरेटचा वापर करू नका. बाहेर फिरायला जा. मित्रमैत्रिणींना भेटा. एखादा छंद जोपासा. इंटरनेटच्या वेगामुळे मेंदू तुलनेने मंद असणाऱ्या क्रियांसोबत जुळवून घेऊ शकत नसेल तर फोन बाजूला ठेवा. थोडा वेळ फिरायला जा. काही काळ मुलांसोबत किंवा पाळीव प्राण्यासोबत घालवा. पुस्तक वाचा. लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधा. मेसेज करत बसण्यापेक्षा फोन करा. एखाद्या दिवशी प्रत्यक्ष भेटा. मस्त गप्पा मारा. यामुळे इंटरनेटवरचं अवलंबित्व कमी होऊ शकेल.


## ही आहेत किडनी विकाराची लक्षणे



**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

**शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा आहे. त्यातही किडनीचे आरोग्य जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे. किडनी निकामी होणे ही एक गंभीर स्थिती आहे. ही स्थिती उद्भवल्यास किडनी योग्यरित्या काम करण्याची क्षमता गमावते. रक्तातील घाण काढून टाकण्याव्यतिरिक्त पाणी फिल्टर करणे, इलेक्ट्रोलाइट्स बॅलन्स करणे अशी किडनीमार्फत होणारी कामे थांबतात आणि परिस्थिती गंभीर होते.**

**किडनी फेलियर मुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. किडनी निकामी होण्याची काही प्रकरणे आजकाल समोर येताना दिसतात. मात्र किडनी निकामी होण्यापूर्वी शरीर काही संकेत देते. त्याबद्दल जाणून घेऊ या.**



* किडनी निकामी होण्याच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे अधिक प्रमाणात थकवा येणे. यामध्ये किडनी रक्तातील टॉक्सिन काढून टाकण्यास अपयशी ठरते. त्यामुळे ॲनिमिया होऊ शकतो. परिणामी व्यक्तीला सतत थकवा, अशक्तपणा आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते.
* अनेकांना रात्री वारंवार उठून लघवी करण्याची सवय असते. अशाप्रकारे रात्री वारंवार लघवी करण्याची गरज वाटत असेल तर हे किडनीच्या समस्येचे लक्षण असू शकते. किडनी योग्यप्रकारे काम करत नाही, तेव्हा शरीरातील द्रव पदार्थ व्यवस्थित फिल्टर होत नाहीत. परिणामी वारंवार लघवीला जावे लागू शकते.
* किडनी फेल झाल्यास शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडू शकते. त्यामुळे रात्री खूप तहान लागण्याची समस्या उद्भवू शकते. त्यामुळेच रात्री वारंवार पाणी पिण्यासाठी उठावे लागणे हे किडनीच्या समस्येचे लक्षण असू शकते.
* लघवीमध्ये रक्त दिसणे हे किडनीचे इन्फेक्शन, स्टोन किंवा इतर गंभीर समस्यांचे लक्षण असू शकते. म्हणूनच लघवीत रक्त दिसले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. ही एक गंभीर स्थिती असू शकते हे लक्षात घ्या.

## मनसोक्त हसा, निरोगी राहा

**डॉ. कुंदन गायकवाड**

आजच्या धावपळीच्या जीवनात लोकांना ताण आणि तणावाचा सामना करावा लागत आहे. मात्र हसल्याने आणि आनंदी राहिल्याने अनेक आजारांपासून आपण दूर रहातो. हसल्याने शरीरातील स्नायूंवरील ताण कमी होतो. म्हणूनच टीव्हीवरील कार्टून पाहून हसा किंवा वृत्तपत्रातील विनोद वाचून हसा. हसण्याचे अनेक फायदे आहेत. हसल्याने ताण कमी होतोच; शिवाय मांसपेशींना आराम मिळतो. त्यामुळे तुम्ही रिलॅक्स होता. हसल्यामुळे शरीरातील ट्रेस हार्मोन लेव्हल कमी होते. ही बाब शरीराच्या एंटीबॉडीजसाठी फायद्याची असते. हसल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते. नैराश्य, चिंता यासारख्या मानसिक समस्या दूर ठेवण्यासही मदत होते. यामुळे हृदयविकार आणि अनेक समस्यांना दूर राहतात. मोकळेपण हसणारे लोक अधिक आनंददायी आणि आरोग्यदायी जीवन जगतात, असे संशोधनातून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे आजकल 'लाफ्टर थेरपी'ला अधिक महत्त्व दिले जात आहे.

**काय फायदे?**

- इम्युन सिस्टीम मजबूतः खळखळून हसल्यानंतर एंडोर्फिन नावाचे हार्मोन रिलीज होते. हे स्ट्रेस कमी करण्यास मदत करते. तसेच प्रतिकारशक्ती वाढविण्यास देखील मदत करते. आजारांशी लढण्यासाठी ताकद मिळते.
- रक्ताभिसरणात सुधारणाः हसल्याने मोठ आजार दूर होतात. आनंदी असाल आणि मोठ्याने हसत असाल तर रक्ताभिसरण चांगल्या पद्धतीने होते. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजार दूर होतात.
- मूड चांगलाः हसल्याने शरीरातील सेरोटोनिन नावाच्या हार्मोनची पातळी वाढते. त्यामुळे मूड चांगला होतो. नैराश्य आणि चिंताविकाराचा धोका कमी होतो. हसल्याने एडोर्फिन हार्मोनचे उत्पादन वाढते जे स्ट्रेस, एंग्जायटी आणि डिप्रेशन दूर करते. हसल्याने मानसिक आरोग्य चांगले राहते. स्मृतीत चांगली वाढ होते. मेंदू चांगले कार्य करू लागतो.
- झोपेशी संबंधीत समस्या दूरः 'लाफ्टर थेरपी'ने अनिद्रेच्या समस्या दूर होतात. हसल्याने शरीरातील मेलानिन हार्मोनचे प्रमाण वाढते. त्यामुळे चांगली झोप लागते.
- वेदना कमी करण्यात मदतः 'लाफ्टर थेरपी'च्या मदतीने शरीरात 'नॅचरल पेनकिलर हार्मोन' रिलीज होतात. त्यामुळे डोकेदुखी, मायग्रेन आणि सांधेदुखीत आराम मिळतो.
- मधुमेहाचा धोका कमी: हसल्याने रक्तातील अधिक साखरेची पातळी कमी होऊ शकते. त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो. तसेच तुम्ही आतून आनंदी राहू लागता.
- मेमरी चांगली:हसल्याने डोक्यातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. त्यामुळे मेमरी चांगली होते. मेंदूचा थकवा दूर होतो. शरीर रिचार्ज व्हायला मदत होते.

काय आहे लाफ्टर थेरपी' ?

'लाफ्टर थेरपी' ही एक नैसर्गिक उपचार पद्धती आहे. त्यात हसण्याला एक व्यायाम मानले जाते. ही थेरपी खासकरुन तणाव, चिंता, डिप्रेशन आणि अन्य मानसिक समस्यांपासून आराम देण्यासाठी असते.

हसण्यासाठी काय करावे?

- दररोज एखादा विनोदी चित्रपट वा मजेदार व्हिडीओ पाहावा. * छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद लुटावा. * कुटुंब आणि मित्रांसोबत अधिक वेळ व्यतित करावा आणि मोकळेपणे हसावे. * लाफ्टर योगा क्लब किंवा ग्रुप जॉईंट करावा.



## वाढत्या तापमानामुळे वाढतो हृदयविकाराचा धोका

**डॉ. दत्तात्रय मुळे**

हवामान बदल ही गंभीर समस्या बनली आहे. वाढते तापमान, असंतुलित हवामान आणि प्रदूषण यांचा केवळ पर्यावरणावरच परिणाम नाही तर आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहे. वाढत्या तापमानामुळे आणि वातावरणातील बदलामुळे हृदयविकाराचा धोका झपाट्याने वाढत असल्याचा दावा ऑस्ट्रेलियात नुकत्याच करण्यात आलेल्या एका अभ्यासात करण्यात आला आहे. जास्त उष्णता हृदयाच्या आरोग्यासाठी चांगली नसते.

■ **हवामान बदलाचा हृदयावर होणारा परिणाम**

संबंधित संशोधकांचे म्हणणे आहे की, तापमान वाढल्याचा शरीरावर परिणाम होतो. शरीर तापू लागते. अशा परिस्थितीत शरीर थंड ठेवण्यासाठी हृदयाला अधिक मेहनत घ्यावी लागते. ही परिस्थिती आधीच कोणत्या ना कोणत्या समस्येशी झुंजत असणाऱ्यांसाठी अधिक धोकादायक ठरते. वाढत्या उष्णतेमुळे रक्तदाबामध्ये असंतुलन होऊ शकते. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक किंवा हृदयाच्या इतर समस्यांचा धोका वाढतो.

■ **उष्णता आणि हृदयरोग**

अभ्यासानुसार, सध्याच्या गतीने हरितगृह वायूंचे उत्सर्जन सुरू राहिल्यास येत्या २५ वर्षांत हृदयविकाराच्या घटनांमध्ये तीनपट वाढ होऊ शकते. हवामान बदलामुळे हृदयाशी संबंधित अन्य आजारांचा धोका वाढू शकतो. वातावरणातील बदलामुळे तापमानात वाढ होत असून तापमान जास्त असणाऱ्या दिवसांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे धोका अधिक गंभीर होत आहे.

■ **भारतात उष्णतेत झपाट्याने वाढ**

यंदा हवामानखात्याने उष्मा वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. मार्च महिन्यातच अनेक भागांत तापमानात वाढ अनुभवायला मिळाली. ओडिशा आणि छत्तीसगडमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मार्चमध्येच तापमान ४० अंशांहून अधिक होते. अतिउष्णतेमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात.

■ **संरक्षण कसे करावे?**

- उन्हाळ्यात शरीर हायड्रेट ठेवणे खूप गरजेचे आहे. यामुळे रक्ताभिसरण व्यवस्थित राहते.
- घरातून बाहेर पडताना मास्क घाला आणि जास्त प्रदूषण असणारी ठिकाणे टाळा.
- हृदय निरोगी ठेवण्यासाठी हिरव्या भाज्या, फळे आणि ओमेगा-३ ने समृद्ध असणाऱ्या गोष्टी खा. तेल आणि मसाले कमी करा.
- नियमित व्यायाम करा. मात्र अतिउष्णतेमध्ये व्यायामाचा अतिरेक टाळा.
- योगा, ध्यान आणि संगीताद्वारे तणाव






# महासागर कर्मयोगी पुरस्काराची क्षणचित्रे



अजय ताहारे



अरुण कोटेचा


क्लादीस पीटर


संजय नाथे


शमाकांत पत्रीकर


धीरज गहाने


डॉ. बोधनकर



डॉ. के.जी. माहेश्वरी


शेल जेमीनी


श्री. गुसारी


दुपारे


श्री. जेठाजी


जितेंद्र लांडे


श्रीकिशन लखोटिया


श्री. लोखंडे


कांता त्रिवेदी


किशोर इनामदार


मधुसुदन त्रिवेदी


श्री. राठीजी


सुधीर बुटे


श्री. पुनेकर


रघुविर सिंग चौहान


संदिप नामपल्लीवार


सुरेश कोटगळे


श्री. टोनी